दैनिक
# जनता आवाज

दैनिक जनता आवाज

## वाचकांसाठी सूचना

पाडवा व भाऊबीजनिमित्त दि. १० ते १२ नोव्हेंबर रोजी कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे तीन दिवस अंक प्रसिद्ध होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार व हितचिंतकांनी नोंद घ्यावी, ही नम्र विनंती

– व्यवस्थापक

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक २३८ वा | सोमवार, दि. ०९ नोव्हेंबर २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

**आजचे हवामान**
कमाल 31°C | किमान 15°C

पेट्रोल 111.21 | डिझेल 97.83

सोने 1,43,570 | चांदी 2,21,000

## संमिश्र

### ऐन दिवाळीत पुण्यात रक्तरंजित थरार

**पुणे** : दिवाळीच्या पूर्वसंध्येला पुण्यात एका रक्तरंजित घटनेने खळबळ उडवली आहे. शहरातील कोथरूड भागातील सुतारदरा परिसरात एका तरुणावर धारदार शस्त्राने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. प्रकाश येवले उर्फ लाल्या (वय २७) असे खून झालेल्या तरुणाचे नाव असून, तो रेकॉर्डबरील गुन्हेगार होता. काही दिवसांपूर्वी त्याचे परिसरातील एका मंडळातील तरुणांशी काही कारणावरून वाद झाले होते. याच जुन्या वादातून हा खून झाला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

### यंदा आमच्याकडे दिवाळी नाही : राजेंद्र पवार

**बारामती** : जानेवारी महिन्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या झालेल्या अकाली आणि अनपेक्षित निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. त्यांच्या निधनानंतरची ही पहिलीच दिवाळी आहे. पवार कुटुंबीय अद्याप या दुःखातून सावरलेले नसून त्यांनी यंदा सण साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत माध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी स्पष्ट केले की, ''यंदा आमच्याकडे दिवाळी नाही. यावेळी आम्ही दिवाळी साजरी करणार नाही. यंदा पहिल्यांदाच अजित पवारांविना दिवाळीचा सण येतोय. त्यामुळे, कुटुंबीयांना मोठं दुःख असल्याने यंदा पवार कुटुंबीय दिवाळी साजरी करणार नाही.''

### रोज ८ शेतकऱ्यांची आत्महत्या : आ. पवार

**सोलापूर** : एआय डेटा सेंटरमुळे ट्रम्प यांच्या पक्षाचा अमेरिकेत पराभव झाला आहे. तिथल्या लोकांनी सुद्धा या प्रकल्पाला नाकारले आहे. हा प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात पाणी, लाईटचा वापर केला जातो, आणि त्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत नाही, आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे. रोहित पवार म्हणाले की, सोलापूरच्या पालकमंत्र्यांनी पाण्याचे नियोजन न केल्याने सर्व पाणी कर्नाटकमध्ये गेले आहे. इथे लोकांना पिण्याचे पाणी सुद्धा मिळणार नाही. ऊजणीतच पाणी राहिले नाही तर लोकांना पाणी मिळणार कुठून? असा सवाल पवारांनी केला आहे. केवळ नेत्यांना सपोर्ट करण्यासाठी एआय डेटा सेंटरचे समर्थन जर भाजपचे नेते करत असतील तर ते फार घातक आहे.




# फळबागांसाठी बोअरवेल बंदी उठणार

## १५ डिसेंबरपर्यंत विशेष सवलत; दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीसांचा दिलासा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर** : दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देत फळबागा वाचविण्यासाठी बोअरवेल खोदकामावरील बंदीत शिथिलता देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला आहे. मात्र, ही सवलत सरसकट लागू होणार नसून ज्या भागांत फळबागा आहेत आणि पाण्याचे दुर्भिक्ष आहे, अशाच ठिकाणी विशेष बाब म्हणून १५ डिसेंबरपर्यंत बोअरवेल खोदण्यास परवानगी देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील लोहारी (सावंगा) येथे मुक्कामी असलेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी परिसरातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतीसमोरील संकटे जाणून घेत त्यांनी विविध उपाययोजनांची माहिती दिली. ''फळबागा वाचविणे अत्यंत गरजेचे आहे. एका फळबागेला उत्पादनक्षम होण्यासाठी दहा-बारा वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे ज्या ठिकाणी पाण्याची तीव्र कमतरता आहे आणि फळबागा धोक्यात आहेत, अशा भागांत बोअरवेल बंदी उठविण्याचा निर्णय घेतला आहे,'' असे मुख्यमंत्री म्हणाले.



### शेतकऱ्याच्या घरी मुक्काम

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थानिक शेतकरी रामभाऊ बालपांडे यांच्या घरी मुक्काम केला. ''रामभाऊ हे लढाऊ वृत्तीचे शेतकरी असून त्यांचा संघर्ष आणि जिद्द प्रेरणादायी आहे,'' असे त्यांनी सांगितले. कर्जमाफीचा लाभ मिळाल्याबद्दल बालपांडे कुटुंबाने समाधान व्यक्त केल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या उपक्रमातून प्रशासनाला स्थानिक गरजांनुसार निर्णय घेण्याचा संदेश देण्यात आला आहे.

### कोरडे जलस्रोत पुन्हा जिवंत करणार

दुष्काळी परिस्थितीत कोरडे पडलेले तलाव, बंधारे आणि जलस्रोतांचे खोलीकरण व गाळ काढण्याची कामे तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या कामांसाठी खोलीकरण आणि गाळ वाहतुकीचा संपूर्ण खर्च राज्य सरकार करणार आहे. दुष्काळाच्या काळात गावपातळीवर पुढाकार घेऊन पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या ग्रामपंचायतींना विशेष मदत दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### मेपर्यंत पाणी पुरवठ्याचे नियोजन

राज्यातील बोअरवेल बंदी पूर्णपणे उठविण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करत मुख्यमंत्री म्हणाले, ''ही केवळ विशेष परिस्थितीतील परवानगी आहे. फळबागा वाचविण्यासाठी मे महिन्यापर्यंत पाण्याची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.''

### जलजीवन मिशनला प्राधान्य

ग्रामीण भागातील रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांनाही गती देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर कामांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झालेल्या गावांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून पाणीपुरवठा सुरू केला जाईल. त्यानंतर ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झालेल्या योजनांना निधी देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## जलसंधारणासाठी गावनिहाय आराखडा तयार करा

### आ. कोल्हे यांचे मंत्री राठोड यांना साकडे; आवश्यक निधीची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : पर्जन्यछायेच्या प्रदेशात असलेल्या कोपरगाव तालुक्यातील पाणीटंचाई आणि घटती भूजल पातळी लक्षात घेता प्रत्येक गावाचा स्वतंत्र मृद व जलसंधारण विकास आराखडा तयार करून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आ. विवेक कोल्हे यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याकडे केली आहे. या मागणीला मंत्री राठोड यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.



सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याला मंत्री संजय राठोड यांनी ६ नोव्हेंबर रोजी भेट दिली होती. यावेळी त्यांनी ऊसतोड कामगारांसोबत दिवाळी साजरी केली. या भेटीदरम्यान आ. कोल्हे यांनी कोपरगाव तालुक्यातील जलसंधारणाच्या विविध

## कौटुंबिक वादातून मुलाने केला वडिलांचा खून

### ८० वर्षीय वडिलांच्या डोक्यात फावड्याने वार; पर्वतीतील जनता वसाहतीत खळबळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : कौटुंबिक वादातून मुलानेच ८० वर्षीय वडिलांच्या डोक्यात फावड्याने वार करून त्यांचा खून केल्याची धक्कादायक घटना पर्वती पायथा परिसरातील जनता वसाहतीत घडली. या प्रकरणी पर्वती पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे. रामचंद्र जगन्नाथ होडे (वय ४६) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मृताचे नाव जगन्नाथ धोंडू होडे (वय ८०, रा. वेताळबाबा मंदिराजवळ, जयभवानीनगर, जनता वसाहत, पर्वती) असे आहे. याप्रकरणी पोलिस कर्मचारी धनंजय रौंदळ यांनी पर्वती पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, होडे कुटुंबीय मूळचे चिपळूण येथील असून, पुण्यातील जनता वसाहत परिसरात वास्तव्यास आहेत. जगन्नाथ होडे हे सुरक्षारक्षक म्हणून काम करत होते. त्यांचा मुलगा रामचंद्र हा कोणतेही काम करत नव्हता. तसेच त्याला दारूचे व्यसन असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

(पान ४ वर)

## ऊसतोड कामगारांसोबत आ. राजळेंची दिवाळी

### कष्टकऱ्यांच्या झोपडीत चहापान; राजळेंनी जाणल्या व्यथा-वेदना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : दिवाळीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा होत असताना घरदार सोडून ऊसतोडीसाठी आलेल्या कामगारांच्या पालावर जाऊन आमदार मोनिका राजळे यांनी त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली. वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरील ऊसतोड कामगारांच्या पालांना भेट देत त्यांनी कामगारांना दिवाळीचा फराळ वाटप केला. तसेच महिला कामगारांना साडी भेट देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. यावेळी कामगारांच्या झोपडीत बसून चहापान करत त्यांनी त्यांच्या अडीअडचणी आणि समस्या जाणून घेतल्या.



ऊसतोड कामगारांचे जीवन म्हणजे संघर्ष आणि कष्टांची अखंड मालिका. पहाटेपासून रात्रीपर्यंत ऊसतोडणीचे काम, संसाराचा गाडा चालविण्याची धडपड आणि प्रतिकूल परिस्थितीत मुलांचे संगोपन, अशा अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागते. या कामगारांचे दुःख आणि अडचणी जवळून समजून घेण्यासाठी आ. राजळे यांनी थेट त्यांच्या पालावर जाऊन संवाद साधला.

पिराजी आत्माराम कीर्तने यांच्या कुटुंबातील महिला कामगारांनी त्यांचे आपुलकीने स्वागत केले. त्यांच्या पालातील चहाचा आस्वाद घेत आमदार राजळे यांनी

(पान ४ वर)

## दीपावली हे आनंद अन् बंधुभावाचे पर्व

### माजी मंत्री थोरात; अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्थांमध्ये लक्ष्मीपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्याची विकासाची वाटचाल ही अनेक पिढ्यांच्या कष्ट, त्याग आणि योगदानातून साकारली आहे. कष्ट आणि प्रगतीचा हा प्रवास सातत्याने सुरू असला, तरी दीपावली हा प्रत्येकाच्या जीवनातील आनंदाचा आणि उत्साहाचा कालखंड असतो. दीपावली हे आनंद, प्रकाश, प्रेम आणि बंधुभावाचे पर्व आहे. यंदा प्रदूषणविरहित दिवाळी साजरी होत असल्याचे विशेष समाधान आहे, असे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीत लक्ष्मीपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अमृत उद्योग समूहातील अमृतवाहिनी बँक, राजहंस दूध संघ, राजहंस ट्रान्सपोर्ट कंपनी आणि जिल्हा सहकारी बँकेच्या विविध संस्थांमध्येही त्यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आले.

कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग घुले, ॲड. माधवराव कानवडे, कांचनताई थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, गणपतराव सांगळे, रामहरी कातोरे, सुधाकर जोशी, हौशीराम सोनवणे, डॉ. हसमुख जैन, सुभाष सांगळे, विनोद हासे, विजय राहणे, सतीश वर्पे, नवनाथ आरगडे, दिलीप नागरे, गुलाबराव देशमुख, अरुण वाकचौरे, चंद्रकांत कडलग, सुंदराबाई दुबे, रामनाथ कुटे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सेक्रेटरी किरण कानवडे, कृष्णा दिघे, अमोल दिघे आदी उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, दीपावलीमध्ये लक्ष्मी, सरस्वती आणि गणपतीचे पूजन ही आपली संस्कृती आहे. प्रत्येक जण वर्षभर धावपळ आणि कष्ट करत असतो. मात्र, दीपावलीचे चार दिवस सर्वांच्या जीवनात आनंद घेऊन येतात. कष्टातूनच लक्ष्मीची पावले घरात येतात आणि त्यातून समृद्धी निर्माण होते. ही समृद्धी आपण

(पान ४ वर)



# दीपावलीनिमित्त संगमनेरचे रस्ते चकाचक

## बाळासाहेब थोरात व आ. सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून अभिनव उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर विकसित आणि वैभवशाली ठरले आहे. संगमनेर शहरात येणाऱ्या चारही बाजूच्या रस्त्यांचे त्यांनी चौपदरीकरण व सुशोभीकरण केले आहे. नव्याने नगरपालिकेच्या स्वच्छता विभागात दाखल झालेल्या स्वीपिंग मशीनने शहरातील रस्त्यांची स्वच्छता केली असून दीपावलीच्या निमित्ताने सर्व रस्ते अत्यंत सुंदर आणि चकाचक झाले आहे.

माजीमंत्री बाळासाहेब थोरात व आ. सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून संगमनेर नगरपरिषदेने नव्याने अडीच कोटींचे स्वीपिंग मशीन, नगरपालिकेचे एक स्वीपिंग मशीन, दहा घंटागाडी, चार ट्रॅक्टर स्वच्छतेसाठी दाखल झाले आहेत. या लोकार्पणाच्या कार्यक्रमात माजीमंत्री थोरात यांनी नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे व उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरपरिषदेचे अधिकारी यांना सूचना केल्या होत्या. त्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सर्व रस्ते स्वच्छ करा.

यानंतर आ. सत्यजित तांबे व सभापती किशोर टोकसे व इतरांनी स्वतः उभे राहून साफसफाईची पाहणी केली. संगमनेर बस स्थानक हा हॅपी हायवे जो लक्ष्मी रोड नावाने ओळखला जातो तो अत्यंत सुंदर पद्धतीने स्वच्छ केला आहे. याचबरोबर विविध सहकारी संस्थांनी या रस्त्यावर डिव्हायडरमध्ये असलेल्या झाडांची छाटणी करून ते आकर्षक बनवले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना मागील चार वर्षापासून या झाडांना दररोज पाणी घालत आहे. त्यामुळे ही झाडे फुलली आहेत. शहरांमध्ये येणाऱ्या चारही बाजूंच्या रस्त्यांचे चौपदरीकरण व सुशोभीकरण आणि विद्युतीकरण झाल्याने संगमनेरात येताना अत्यंत आनंददायी वातावरण वाटत आहे. धुळमुक्त शहराची संकल्पना राबवण्यासाठी नगर परिषदेने सातत्याने विविध उपक्रम राबवले असून स्वच्छतेमध्ये नागरिकांचा मोठा सहभाग राहिला आहे. सार्वजनिक स्वच्छता, ओला कचरा, सुका कचरा यासाठी नगरपरिषदेकडून मोठे काम झाले असून आता रस्त्यांचे स्वच्छता अभियानामुळे दीपावलीच्या निमित्ताने शहरात येणारे रस्ते



मागील दोन वर्षांपूर्वी संगमनेर बसस्थानक परिसरामध्ये अवैध फ्लेक्स मोठ्या प्रमाणात लागले होते. यामुळे व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान होत होते आणि शहराचे विद्रूपीकरण झाले होते. यानंतर आ. सत्यजित तांबे यांच्या पुढाकारातून फ्लेक्स बंदी करण्यात आली असून दीपावलीच्या निमित्ताने शहरांमध्ये कुठेही फ्लेक्स नसल्याने नागरिक ही आनंदी आहेत. शहराचे सौंदर्य व सुशोभीकरण वाढवण्यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचे आहे. **– सत्यजित तांबे, आमदार**

# शेतकऱ्यांच्या न्यायासाठी सोसायटीचे सहकार्य!

## ११२ शेतकऱ्यांच्या कर्जप्रकरणाची चौकशी सुरू : पटारे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान विविध कार्यकारी सेवा सोसायटीमधील ११२ शेतकरी कर्जदार कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिल्याच्या प्रकरणाची चौकशी सुरू झाली असून, या चौकशीसाठी संस्थेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य केले जाणार असल्याची ग्वाही सोसायटीचे विद्यमान चेअरमन राहुल पटारे यांनी दिली.

या प्रकरणी कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनी सहाय्यक निबंधक, श्रीरामपूर यांच्याकडे निवेदन व तक्रार अर्ज दाखल केला आहे. तसेच या प्रश्नाकडे अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचेही लक्ष वेधण्यात आले होते. शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट व्हावी, या उद्देशाने पालकमंत्री विखे पाटील यांनी टाकळीभान सोसायटीच्या कर्ज विभागातील खात्यांची निष्पक्षपणे तपासणी करून योग्य तो न्यायनिवाडा करण्याचे आदेश



संबंधित विभागाला दिले होते. या आदेशानुसार सोसायटीच्या कर्ज खात्यांची तपासणी करण्यासाठी नवीन लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्यक्ष तपासणीचे काम सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर चेअरमन राहुल पटारे म्हणाले की, संस्थेचे चेअरमन, उपाध्यक्ष, संचालक मंडळ आणि सचिव यांच्यासह सर्व पदाधिकारी या चौकशी प्रक्रियेला पूर्ण सहकार्य करत आहेत. कर्ज विभागातील व्यवहारांची सखोल तपासणी होऊन सत्य परिस्थिती समोर यावी आणि शासनाच्या नियमांनुसार संबंधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा, हीच आमची भूमिका आहे. कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी संस्था ठामपणे उभी असून, त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. या चौकशीमुळे वस्तुस्थिती स्पष्ट होऊन योग्य तो निर्णय होईल, असा विश्वासही पटारे यांनी व्यक्त केला. दरम्यान, सोसायटी ही गावची कामधेनू असून शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणारी महत्त्वाची संस्था आहे. संस्थेचे आर्थिक व्यवहार सक्षम राहण्यासाठी सभासद व कर्जदारांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेत करावी, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच २०२६ मधील प्रस्तावित कर्जमाफी योजनेत पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळावा, यासाठी संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

> शेतकरी बांधवांनी आपल्या कर्जखात्यांची व कर्जमाफी प्रक्रियेची वेळोवेळी पडताळणी करून घ्यावी. शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेबाबत जागरूक राहावे. **– राहुल पटारे**

# ॲड. राऊतांच्या युक्तिवादाने सायकर निर्दोष

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राशीन** : कर्जत तालुक्यातील करपडी येथील बेलावडा ओढ्यातून वाळू चोरी करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपातून बहिरोबावस्ती, राशीन येथील नानासाहेब विठ्ठल सायकर यांची कर्जत न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. या खटल्यात ॲड. हरिश्चंद्र जंबु राऊत यांनी प्रभावीपणे कायदेशीर बाजू मांडत अभियोग पक्षाच्या पुराव्यांमधील त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मॉर्निंग वॉक टीम राशीनच्या वतीने त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ३७९ सह ५११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. ३१ मार्च २०१८ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या सहाय्याने शासनाच्या मालकीची वाळू चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप नानासाहेब सायकर यांच्यावर ठेवण्यात आला होता.

खटल्याच्या सुनावणीदरम्यान अभियोग पक्षातर्फे चार साक्षीदार तपासण्यात आले. मात्र, पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. तसेच स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव, घटनास्थळाबाबतची अपुरी माहिती, वाळूच्या साठ्याचे प्रमाण आणि खड्ड्यांच्या मोजमापाबाबत आवश्यक स्पष्टता नसल्याचे मुद्दे समोर आले.

ॲड. हरिश्चंद्र जंबु राऊत यांनी या सर्व बाबींचा कायदेशीर आधार घेत न्यायालयासमोर आरोपीची बाजू भक्कमपणे मांडली. अखेर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोप संशयातीतरीत्या सिद्ध होत नसल्याचे निरीक्षण नोंदवत कर्जत येथील दुसरे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस. एन. थापेकर यांनी २ नोव्हेंबर २०२६ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये नानासाहेब विठ्ठल सायकर यांची निर्दोष मुक्तता केली.

गुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर असते. त्यासाठी ठोस आणि विश्वासार्ह पुरावे आवश्यक असतात. संशयाच्या पलीकडे जाऊन आरोप सिद्ध न झाल्यास आरोपीला निर्दोष मुक्ततेचा लाभ मिळतो, हा न्यायव्यवस्थेतील मूलभूत सिद्धांत या निकालातून पुन्हा अधोरेखित झाला आहे.

# लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शिवरायांचे पूजन

## जनसेवा मंडळाच्या युवकांचे अनोखे अभिवादन; पुतळ्याची युवकांनी केली स्वच्छता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : लक्ष्मीपूजन आणि दिवाळीच्या मंगलमय पर्वाचे औचित्य साधत पुणतांबा येथील जनसेवा मंडळाच्या युवकांनी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची स्वच्छता करून विधिवत पूजन केले. फुलांची आकर्षक सजावट, पुष्पहार अर्पण आणि आरती करत युवकांनी शिवरायांना अनोख्या पद्धतीने अभिवादन केले. या उपक्रमातून युवकांनी शिवरायांप्रती असलेली निष्ठा, आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी युवकांनी शिवरायांच्या पुतळ्याला पाणी व शाम्पूने स्वच्छ स्नान घातले. त्यानंतर स्वच्छ कापडाने पुतळा पुसून पुष्पहार अर्पण करण्यात आला. आकर्षक फुलांची सजावट, घोड्याच्या पायांना फुलांचे अलंकार आणि फुलांची उधळण करण्यात आली. यानंतर आरती



करून फटाक्यांची आतषबाजी करत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांचा हा अश्वारूढ पुतळा गेल्या दीड ते दोन वर्षांपासून चांगदेव साखर कारखान्याच्या गोदामात स्मारकाच्या प्रतीक्षेत आहे. पुणतांबा येथे महाराजांचे भव्य स्मारक उभारावे, अशी ग्रामस्थांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. यासाठी तत्कालीन सरपंच डॉ. धनंजय धनवटे यांच्या कार्यकाळात लोकसहभागातून स्मारक उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले होते. त्यातून महाराजांचा अश्वारूढ पुतळाही आणण्यात आला; मात्र जागेसंदर्भातील वादामुळे स्मारकाचे काम रखडले. परिणामी, महाराजांचा पुतळा अद्यापही गोदामातच ठेवण्याची वेळ आली आहे.

दिवाळीच्या निमित्ताने जनसेवा मंडळाच्या युवकांनी पुतळ्याची स्वच्छता व पूजन करून शिवरायांप्रती आपली भावना व्यक्त केली. मात्र, शिवरायांचा पुतळा गोदामात राहणे ही खेदाची बाब असून, पुणतांब्यात लवकरात लवकर भव्य शिवस्मारक उभारून पुतळ्याला सन्मानाचे स्थान मिळावे, अशी भावना उपस्थित युवकांनी व्यक्त केली.

या उपक्रमात ग्रामपंचायत सदस्य भूषण भाग, रामचंद्र पवार, राहुल धनवटे, योगेश घाटकर, पंकज नळे, नितीन भगत, अरुण थोरात, अशोक गायकवाड, रामदास काळे, चक्रधर सोनवणे, संजय धनवटे, सागर शिंगाडे, किशोर सांबरे, प्रशांत पऱ्हे, हरीश टूपके, राहुल वाणी, मयूर मलठणकर, बी. एस. पाटील, दादा आग्रे, प्रतीक धनवटे, अमोल धनवटे, रामदास धनवटे, विवेक पारखे, कल्याण सांबरे, अजिंक्य बोबडे, पोपट गडाख, संतोष शिंदे, बीरजू ओहळ यांच्यासह जनसेवा मंडळाचे अनेक युवक उपस्थित होते.

# दिवाळीत हरेगाव–उंदिरगाव बाजारपेठ उजळली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : दिवाळीच्या प्रकाशपर्वाचे औचित्य साधत हरेगाव–उंदिरगाव बाजारपेठ परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या पथदिव्यांचे (स्ट्रीट लाईट) लोकार्पण शनिवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी मान्यवरांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. फीत कापून व विद्युत बटण दाबून या सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. उंदिरगाव ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे बाजारपेठ आता रात्रीच्या वेळीही प्रकाशाने उजळणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास अशोक कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश पाटील गलांडे, संचालक विरेश पाटील गलांडे, बाजार समिती सदस्य राजेंद्र पाऊलबुद्धे, जिल्हा परिषदचे माजी सदस्य बाळासाहेब नाईक, भूमी फाउंडेशनचे भीमराज बागुल आदी मान्यवर उपस्थित होते.

हरेगाव–उंदिरगाव बाजारपेठ परिसरात रात्रीच्या वेळी अंधारामुळे व्यापारी, ग्राहक आणि नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. नव्या पथदिव्यांमुळे ही समस्या दूर होण्यास मदत होणार आहे. तसेच बाजारपेठेत येणाऱ्या ग्राहकांसह परिसरातून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेतही भर पडणार आहे.

यावेळी सोपान नाईक, बशीरभाई तांबोळी, बाळासाहेब रोकडे, बबनराव नाईक, दादासाहेब खर्डे, राजेंद्र नाईक, जितेंद्र गोलवड, बाबासाहेब



नाईक, पांडुरंग राऊत, अमोल नाईक, नितीन गलांडे, महेश गायके, श्री. बोधक, चंद्रकांत गायकवाड, रमेश गाडेकर, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब निपुंगे, अब्बास शेख, सुधीर ताके, ज्ञानेश्वर बांद्रे, इसाकभाई तांबोळी, सुनील आव्हाड, बाळासाहेब ताके, अशोक बांद्रे, सचिन आव्हाड, दीपक बोधक, उमेश दिवे, संजय काळे, रोहित सोमवंशी, संजय भनगडे, मुकेश गाडेकर, किशोर गायकवाड, अनिल वैद्य, सुनील वैद्य, सचिन गायकवाड यांच्यासह बाजारपेठेतील व्यापारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्रामपंचायतीचा उपक्रम कौतुकास्पद

दिवाळीच्या शुभमुहूर्तावर बाजारपेठेत प्रकाशाची नवी सुविधा उपलब्ध झाल्याने व्यापारी आणि ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांना प्राधान्य देत उंदिरगाव ग्रामपंचायतीने केलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरत असून बाजारपेठेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

# सभासदांच्या घरात दिवाळीचा गोडवा

## संत सावता सोसायटीकडून सभासदांना १० किलो साखरेचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील श्री संत सावता माळी सेवा संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीनिमित्त सभासदांना प्रत्येकी १० किलो साखरेचे वाटप करण्यात आले. तसेच पत्रकार बांधवांनाही साखर देऊन दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेच्या या उपक्रमामुळे सभासदांसह पत्रकार बांधवांचीही दिवाळी गोड झाली.

सभासदांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या उद्देशाने दि. ६ रोजी संस्थेच्या संचालक मंडळाच्या उपस्थितीत साखर वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सभासदांना प्रत्येकी १० किलो साखरेचे वाटप करण्यात आले. संस्थेने जपलेली ही परंपरा सभासदांसाठी आनंददायी ठरत असून, सहकाराच्या माध्यमातून सभासदांच्या आनंदात सहभागी होण्याचा संस्थेचा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.

यावेळी अशोकचे माजी अध्यक्ष ज्ञानदेव



साळुंके, कारेगाव भागाचे संचालक शिवाजी शिंदे, राष्ट्रवादी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, बाजार समिती संचालक मयूर पटारे, संत सावता संस्थेचे संचालक विलास दाभाडे, माजी उपसरपंच भारत भवार, संचालक दत्तात्रय नाईक, गोटीराम दाभाडे, माजी उपाध्यक्ष प्रकाश दाभाडे, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब शिंदे, बाबासाहेब तनपुरे, माजी सरपंच भाऊसाहेब मगर, गजानन कोकणे, विठ्ठल लाड, श्रीधर गाडे, प्रल्हाद कापसे, गोरख खुरूड, शिवाजी पटारे, इंद्रभान दाभाडे, किशोर दाभाडे आदी उपस्थित होते.

# पारदर्शक कारभारातूनच संस्थेची प्रगती

## बाजीराव जाधव; कर्जत शाखेत लक्ष्मीपूजन उत्साहात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : संस्थेचा कारभार पारदर्शक आणि सभासदांच्या हिताला प्राधान्य देणारा असेल, तर संस्थेची प्रगती निश्चित होते. अ. नगर माध्यमिक शिक्षक सोसायटीमध्ये चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि सर्व संचालक मंडळ सभासदांच्या हिताची जाणीव ठेवून सचोटीने काम करत असल्याने संस्थेची वाटचाल समाधानकारक सुरू आहे, असे प्रतिपादन संस्थेचे तज्ज्ञ संचालक बाजीराव जाधव यांनी केले.

दीपावलीनिमित्त अ. नगर माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या कर्जत शाखेत लक्ष्मीपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तज्ज्ञ संचालक बाजीराव जाधव यांच्या हस्ते विधिवत लक्ष्मीपूजन करण्यात आले. या निमित्ताने उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा देताना त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. सभासदांचा विश्वास हीच संस्थेची खरी ताकद असून त्यांच्या गरजा आणि हित लक्षात घेऊन संस्थेचे कामकाज सुरू आहे. संचालक मंडळाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे संस्थेची प्रगती होत असल्याचेही जाधव यांनी नमूद केले.

यावेळी राजाराम माने, सुनील भोसले, कैलास सुपेकर, संजय तापकीर, दत्तात्रय टकले, लालासाहेब काळे, अनिल गावडे, रावसाहेब यादव, सुनील थोरात, पांडुरंग धनवडे, शाखाधिकारी एकनाथ कोकाटे यांच्यासह संस्थेचे सभासद व मान्यवर उपस्थित होते.

लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने संस्थेच्या कर्जत शाखेत दीपावलीचा आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा देत कार्यक्रमाची सांगता झाली.

# छत्रपती शिवरायांच्या चरणी दीपांजली

## शिवप्रेमींनी साजरा केला स्वाभिमानाचा दीपोत्सव; जयघोषाने परिसर दुमदुमला



> दिवाळी हा बळीराजाच्या कष्टाचा आणि समृद्धीचा उत्सव आहे. मात्र, रयतेचे राज्य निर्माण करून स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण केल्याशिवाय हा आनंदोत्सव पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे दिवाळीतील पहिला दिवा महाराजांच्या चरणी अर्पण करून त्यांच्या विचारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे. हा केवळ दीपोत्सव नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा उत्सव आहे. **– अनिता काळे**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : दिवाळीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना दीप अर्पण करून करण्याची परंपरा जपत अहिल्यानगरमध्ये शिवप्रेमींनी अनोखा दीपोत्सव साजरा केला. मराठा समन्वय परिषदेच्या वतीने शनिवारी जुने बसस्थानक परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याभोवती दीपप्रज्वलन करण्यात आले. पणत्यांच्या प्रकाशाने उजळलेल्या या परिसरात शिवप्रेमींचा उत्साह आणि शिवरायांप्रती असलेली श्रद्धा अनुभवायला मिळाली.

जय भवानी, जय शिवाजी, जय जिजाऊ, जय शिवराय, जय शंभूराजे अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. महिला, युवक–युवतींसह मोठ्या संख्येने शिवप्रेमींनी या उपक्रमात सहभागी होत महाराजांच्या चरणी दीपांजली अर्पण केली. पणत्यांच्या प्रकाशात उजळलेला महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि वातावरणात घुमणारा शिवरायांचा जयघोष यामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

या दीपोत्सवात मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा लकाताई मुंदडा, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा ॲड. स्वाती जाधव, लीला अग्रवाल, सुचिता बोरकर, अरुणा गोयल, मेघना मुनोत, निष्ठा सुपेकर यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

# राज्यात कुऱ्हाडबंदी निर्णय रद्द करा

## पेसा कायद्याची अंमलबजावणी करा; आदिवासी बांधवांच्या उपजीविकेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : भीमाशंकर, कळसूबाई आणि हरिश्चंद्रगड अभयारण्यासह सह्याद्रीच्या पर्वतरांगांतील आदिवासी बांधवांच्या पारंपरिक हक्कांचा आणि उपजीविकेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वनसंवर्धनाच्या नावाखाली लादण्यात येणारी कथित कुऱ्हाडबंदी, इको सेन्सिटिव्ह झोनमधील निर्बंध आणि स्थानिकांच्या मूलभूत प्रश्नांवरून सुरू असलेल्या आमरण उपोषणाला आता व्यापक पाठिंबा मिळत आहे.

समाजसेवक अनंत घाणे यांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दिला असून, शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनाला तुकाराम खाडे, रामदास पिचड, सचिन भवारी, मच्छिंद्र खाडे, दिलीप भागडे, योगेश खाडे, पंढरी खाडगीर, सुनील पवार यांच्यासह अकोले तालुक्यातील अनेक आदिवासी बांधवांनी पाठिंबा दर्शविला आहे. उपोषणस्थळी प्रांताधिकारी तसेच विविध सरकारी विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील आदिवासींच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाला समाजसेवक अनंत घाणे यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला.



आंदोलनकर्त्यांनी आपल्या विविध मागण्या प्रशासनासमोर ठामपणे मांडल्या. कुऱ्हाडबंदीचा निर्णय रद्द करावा, इको सेन्सिटिव्ह झोनबाबत स्थानिकांना विश्वासात घ्यावे, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, आदिवासी समाजावर कोणतेही निर्णय लादू नयेत आणि स्थानिकांना त्यांच्या पारंपरिक उपजीविकेपासून व रोजगाराच्या संधींपासून वंचित ठेवू नये, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

बैठकीदरम्यान समाजसेवक अनंत घाणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः उपोषणस्थळी उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांशी प्रत्यक्ष चर्चा करावी, अशी मागणी केली. केवळ अधिकारी पाठवून किंवा तोंडी आश्वासने देऊन आदिवासींचे प्रश्न सुटणार नाहीत. सह्याद्री परिसरातील आदिवासी बांधवांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न शासनाने गांभीर्याने घ्यावेत. उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट द्यावी आणि सर्व मागण्यांबाबत लेखी निर्णय द्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

सह्याद्रीचे जंगल वाचले पाहिजे, पर्यावरणाचे संरक्षण झाले पाहिजे अशी मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे नाही एकीकडे आमरण उपोषण सुरू असून दुसरीकडे उपोषणकर्त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळकाढूपणा न करता तातडीने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी पुढे आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी येऊन चर्चा करावी सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि तो लेखी स्वरूपात द्यावा. मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

मागणी करतानाच आदिवासींच्या पिढ्यान् पिढ्यांच्या पारंपरिक हवकांवर गदा येता कामा नये. वनसंवर्धन आणि आदिवासींचे हक्क यांचा समतोल राखत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा हे आंदोलन अधिक व्यापक आणि तीव्र करण्याचा इशारा आदिवासी बांधवांनी दिला आहे. त्यामुळे आता जिल्हा प्रशासन आणि शासनाच्या भूमिकेकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# नागवडे कारखान्याचे पेमेंट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीगोंदा** : सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने सन २०२५-२६ च्या गळीत हंगामातील ऊस विकास प्रोत्साहन अनुदान तसेच कामगारांचा पगार व बोनस मिळून ११.३४ कोटी रुपयांची रक्कम संबंधितांच्या बँक खात्यात वर्ग केली आहे. सभासद शेतकऱ्यांना दिलेल्या शब्दाची पूर्तता केल्याचे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी सांगितले.

कारखान्याने यंदा ५ लाख ८१ हजार ६० टन उसाचे गाळप केले असून, शेतकऱ्यांना प्रतिटन ३ हजार रुपये पहिला हप्ता दिला आहे. त्यानंतर प्रतिटन १५० रुपये प्रमाणे ८.७२ कोटी रुपयांचे ऊस विकास प्रोत्साहन अनुदान, तर कामगारांचे २.६२ कोटी रुपये पगार व बोनस अदा करण्यात आले आहेत. सभासदांना सवलतीच्या दरात साखर वाटप सुरू असून, ७ तारखेपर्यंत साखर घेऊन जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सहकारी साखर कारखानदारी टिकविण्यासाठी शेतकऱ्यांनी सहकार्य करावे. चालू गळीत हंगाम जानेवारी २०२७ अखेरपर्यंत सुरू राहण्याची शक्यता असल्याने सभासदांनी आपला ऊस नागवडे कारखान्यास गळीतासाठी द्यावा, असे आवाहन नागवडे यांनी केले.

# लोकनेते राजळे फार्मसी कॉलेजमध्ये 'नवांकुर' उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : श्री दादापाटील राजळे शिक्षण संस्थेच्या लोकनेते आप्पासाहेब राजळे कॉलेज ऑफ फार्मसी, आदिनाथनगर येथे नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित 'नवांकुर २०२६' हा स्वागत समारंभ व इंडक्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष बाबासाहेब किलबिले होते, तर आदिनाथ कृषी विकास प्रतिष्ठानचे सचिव भास्कर गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा, शिस्त, अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, विविध उपक्रम तसेच फार्मसी क्षेत्रातील करिअरच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शांताराम खणगे यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच व्यक्तिमत्त्व विकास, संशोधन, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.प्राचार्य डॉ. खणगे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. अपेक्षा फुंदे, प्रा. रामचंद्र हंडाळ, प्रा. अनिकेत डाके व प्रा. आरती भागवत यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.यावेळी डॉ. अंबादास कटारनवरे, विभागप्रमुख स्मिता गाडेकर उपस्थित होते. संस्थेच्या विश्वस्त तथा आमदार मोनिका राजळे, राहुल राजळे, कृष्णाद राजळे व भास्कर गोरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करून नवागत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस सदिच्छा व्यक्त केल्या.सूत्रसंचालन प्रा. रामचंद्र हंडाळ तर प्रा. अनिकेत डाके यांनी आभार मानले.

# अर्ज करूनही मिळेना नो ड्यूज दाखला

## हिरडगाव संस्थेच्या कर्जदारांना हेलपाटे मारण्याची वेळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : हिरडगाव सेवा सहकारी सेवा सोसायटीकडून कर्ज व थकबाकी तसेच सभासदत्वाबाबतचा दाखला मिळावा, या मागणीसाठी संस्थेचे सभासद दत्तात्रय मोहन देरकर व ज्ञानेश्वर दादा बनकर यांनी सचिव तथा चेअरमन यांच्याकडे लेखी अर्ज केला आहे. मात्र, अर्ज करूनही दाखला मिळत नसल्याने संबंधित सभासदांनी नाराजी व्यक्त केली आहे.

अर्जदारांनी निवेदनानुसार, दि. दिलेल्या २९ ऑक्टोबर रोजी त्यांनी संस्थेकडे १ ते ३२ लोकांचे संस्थेकडे कर्ज व थकबाकी आहे किंवा नाही, तसेच संबंधित व्यक्ती संस्थेचे सभासद आहेत किंवा नाहीत, याबाबतचा दाखलास मिळण्यासाठी लेखी अर्ज केला होता. मात्र, संस्थेच्या सचिव तथा चेअरमन यांनी संबंधित माहिती देण्यास असमर्थता दर्शविल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. या दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी संबंधित लोकांची यादी व आवश्यक कागदपत्रांसह दि. ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, श्रीगोंदा येथे आमरण उपोषणास बसण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. या प्रकरणाची जबाबदारी हिरडगाव सोसायटीच्या सचिव तथा चेअरमन यांची राहील, असे अर्जदारांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच दाखला देऊन आमच्यावर आमरण उपोषणाची वेळ येऊ देऊ नये, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

# कडा प्रकल्पांवरील अनधिकृत उपसा अखेर बंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आष्टी** : तालुक्यातील कडी (दादेगाव) आणि कडा (लिंबोडी) या दोन्ही मध्यम प्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठा पूर्णपणे संपलेला असतानाही, मृतसाठ्यातून सिंचनासाठी अनधिकृत पाणीउपसा सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी (ता. ५) आष्टीचे तहसीलदार आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त मोहीम राबवून हा अनधिकृत उपसा तातडीने बंद पाडला.

दोन्ही प्रकल्पांतील अनधिकृत पाणीउपसा थांबविण्याबाबत प्रशासनाकडून यापूर्वी संबंधितांना वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, या सूचनांना केराची टोपली दाखवत बहुतांश पंपांद्वारे सिंचनासाठी दोन्ही प्रकल्पांत उपयुक्त पाणीसाठा पाण्याचा उपसा सुरूच असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे तहसीलदार आणि पाटबंधारे उपविभागाचे उपविभागीय अभियंता यांच्या उपस्थितीत महसूल व जलसंपदा विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी धडक देऊन ही कारवाई केली. यापूर्वी प्रशासनाने मेहकरी प्रकल्पातील अनधिकृत पाणीउपशावर कारवाई करत ५५ विद्युत पंप हटविले होते. त्यानंतर आता कडी आणि कडा प्रकल्पांवर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. कारवाईदरम्यान साहित्याचे नुकसान टाळण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आपले पंप, पाइप आणि सोलर यंत्रणा स्वतः हून काढून घ्यावी, तसेच बंद केलेला पाणीउपसा कोणत्याही मागनि पुन्हा सुरू करू नये, असा कडक इशारा प्रशासनाने दिला आहे.

### उपयुक्त साठा शुन्य टक्के

जलसंपदा विभागाच्या गुरुवारी (ता. ५) सकाळी ८ वाजताच्या अहवालानुसार, कडी आणि कडा या दोन्ही प्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठा शून्य टक्क्यांवर आला आहे. कडी प्रकल्प (दादेगाव): एकूण क्षमता ७.५८० दलघमी असून, सध्या केवळ ०.८३२ दलघमी मृतसाठा शिल्लक आहे. उपयुक्त साठा शुन्य टक्के आहे. कडा प्रकल्प (लिंबोडी): एकूण क्षमता ९.९९१ दलघमी असून, सध्या केवळ ०.०४३ दलघमी मृतसाठा शिल्लक आहे. याचाही उपयुक्त साठा शुन्य टक्के आहे.

# समर्थ कॉलेजचा शैक्षणिक सामंजस्य करार




### करार शैक्षणिक प्रगतीतील महत्त्वपूर्ण टप्पा

संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके आणि विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेल्या या शैक्षणिक चळवळीने आज १४ विविध प्रकारच्या महाविद्यालयाच्या माध्यमातून ५,५०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक सहकार्याचे नवे दालन खुले करणारा हा सामंजस्य करार समर्थ संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीतील महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेल्हे** : विद्यार्थी व प्राध्यापकांच्या आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचा मार्ग मोकळा; संशोधन, प्रशिक्षण आणि सांस्कृतिक आदान-प्रदानाला मिळणार चालना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे (ता. जुन्नर, जि. पुणे) आणि फिलिपिन्स देशातील कॅटबालोगन सिटी कम्युनिटी कॉलेज यांच्यामध्ये नुकताच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य करारावर फिलिपिन्स येथील कॅटबालोगन सिटी कम्युनिटी कॉलेज चे अध्यक्ष डॉ. निगेल एल कॉर्नजो आणि समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य प्रा.डॉ.नवनाथ नरवडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी युवा शास्त्रज्ञ डॉ प्रतीक मुणगेकर, प्रा. रतिलाल बाबेल, प्रा. तानाजी वामन, समर्थ कॉलेजचे प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदिप गाडेकर तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. सचिन पोखरकर उपस्थित होते. या आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारामुळे दोन्ही शैक्षणिक संस्थांमधील शैक्षणिक सहकार्य अधिक दृढ होणार असून विद्यार्थी व प्राध्यापकांची आंतरराष्ट्रीय स्तरावर देवाणघेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक संसाधनांची उपलब्धता आणि ज्ञानाची देवाणघेवाण यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार आहे.

या करारांतर्गत दोन्ही संस्थांमधील प्राध्यापकांना अल्पकालीन अध्यापनासाठी संधी उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांसाठी सेमिस्टर किंवा शैक्षणिक वर्षाच्या कालावधीतील विद्यार्थी विनिमय कार्यक्रम राबविणे, कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन करणे यावर भर देण्यात येणार आहे. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण, इंटर्नशिप उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे. दोन्ही संस्थांमधील शैक्षणिक जर्नल्स, संशोधन प्रकाशने,अध्यापन साहित्य आणि इतर शैक्षणिक साधनसामग्रीची देवाणघेवाण करण्यासाठीही सहकार्य केले जाणार आहे.

# लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

## तलावांची अधिकृत मोजणी करून अतिक्रमणे हटविण्याची मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील महांडूळवाडी येथील शासकीय तलावांची अधिकृत मोजणी करून तलावांच्या हद्दीतील अतिक्रमणे हटवावीत, तसेच शासकीय मालमत्तेचे संरक्षण करावे, या मागणीसाठी ग्रामस्थांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाची अखेर प्रशासनाने दखल घेतली. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी उपोषण मागे घेतले. मात्र, तलावांची मोजणी आणि अतिक्रमण हटविण्याची प्रत्यक्ष कार्यवाही लवकरात लवकर व्हावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

महांडूळवाडी येथील शासकीय तलावांची अधिकृत मोजणी करून तलावांच्या हद्दीतील अतिक्रमणे निश्चित करावीत व नियमानुसार ती हटवावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी २६ ऑक्टोबर रोजी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली होती.

तसेच ३१ ऑक्टोबरपर्यंत मोजणी पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली होती. मोजणीदरम्यान कोणताही दवाव अथवा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली होती.

मात्र, प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. शासकीय तलावांचे अस्तित्व, त्यांची मूळ हद्द आणि जलसाठ्याचे संरक्षण करणे आवश्यक असताना प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता. अखेर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरू केले.

### अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही पूर्ण करा

तलावांची अधिकृत मोजणी भूमिअभिलेख विभागामार्फत करावी, मोजणीची तारीख व वेळ ग्रामस्थांना लेखी स्वरूपात कळवावी, मोजणीदरम्यान पोलीस बंदोबस्त ठेवावा आणि अतिक्रमणे निश्चित झाल्यानंतर नियमानुसार कारवाई करावी, अशा प्रमुख मागण्या ग्रामस्थांनी केल्या आहेत. उपोषण सुरू असताना तहसीलदारांनी ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिले. त्यामुळे ग्रामस्थांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार तलावांची मोजणी आणि अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# ९२ पोलिस अंमलदारांच्या विनंती बदल्या

## जिल्हा पोलिस दलात फेरबदल; एसपी सुदर्शन यांचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्हा पोलीस दलातील ९२ पोलीस अंमलदारांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शुक्रवारी (६ नोव्हेंबर) याबाबतचे आदेश काढले आहेत. पोलीस शिपाई ते श्रेणी पोलीस उपनिरीक्षक तसेच चालक पोलीस शिपाई ते चालक श्रेणी पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील अंमलदारांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्यांचा यामध्ये समावेश आहे.




जिल्हा पोलीस दलातील शेकडो अंमलदारांनी विनंती बदली करण्यासाठी अर्ज केले होते. पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी अर्ज केलेल्या अंमलदारांचा वार घेऊन त्यांची विनंती बदलीसाठीची अडचण जाणून घेतली होती. यानंतर ९२ पोलीस अंमलदारांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. जिल्हा पोलीस दलातील अंमलदारांच्या विनंती व प्रशासकीय बदल्यांसाठी जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाची गुरूवारी (५ नोव्हेंबर)बैठक झाली. या बैठकीत बदल्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करून विविध बाबींचा विचार करण्यात आला. त्यानंतर जनहित, कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी, प्रशासकीय निकड आणि पोलीस ठाण्यांमधील मनुष्यबळाची उपलब्धता या निकषांवर बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले. जिल्ह्यात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याने त्याचा तपास करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यावरही आस्थापना मंडळाने भर दिला. तसेच विविध पोलीस ठाण्यांमधील अपुरे संख्याबळ, प्रशासकीय कामकाजाची गरज आणि पोलीस अंमलदारांच्या वैयक्तिक अडचणींचाही विचार करण्यात आला. यासाठी

दरम्यान, बदली झालेल्या अंमलदारांना सध्याच्या ठिकाणचा कार्यभार, प्रलंबित गुन्ह्यांचा तपास आणि अर्ज प्रकरणे यांची चार्ज यादीनुसार संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांकडे हस्तांतरण करून नवीन आदेश काढले आहेत.

### पोलीस अधीक्षकांनी दिले आदेश

दरम्यान, यापूर्वी निर्गमित केलेल्या काही बदली आदेशांमध्ये अंशतः बदल करून सुधारित आदेशही जारी करण्यात आले आहेत. बदली आदेशात नाव समाविष्ट नसलेल्या अंमलदारांचे विनंती अर्ज मात्र अमान्य करण्यात आले असून, ते दप्तरी दाखल करण्यात आले आहेत. नियुक्तीच्या ठिकाणी तातडीने हजर होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, बदली झालेल्या अंमलदारांना नवीन ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करताना त्यांच्या जागी नवीन अंमलदार येण्याची प्रतीक्षा करू नये, असे आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले आहेत.

# गावातच उघडणार आता बँक खाती

## केवायसी अन् योजनांची गावपातळीवर माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : बँक खाते, विमा किंवा केवायसीसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना आता बँकांच्या चकरा मारण्याची गरज भासणार नाही. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, २१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत जिल्हा प्रशासन, जिल्हा अग्रणी बँक कार्यालय आणि विविध बँकांच्या संयुक्त विद्यमाने विशेष आर्थिक समावेशन संतृप्तता मोहीम राबविण्यात येत आहे.



त्यात गावपातळीवर बँकिंग शिबिरे आयोजित करून नागरिकांना विविध योजनांची माहिती देण्यासह आवश्यक नोंदणी आणि प्रलंबित कामे पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. गावपातळीवर बँकिंग शिबिरांचे आयोजन जिल्हा प्रशासन व जिल्हा अग्रणी बँकेच्या वतीने गावपातळीवर बँकींग शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, योजनांची माहिती देण्यात येत आहे. त्यामुळे गावातच नागरिकांना ३ बँक खात्यांची माहिती मिळणार असून, खते उघडता येणार आहे. गावातच शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याने नागरिकांचा प्रवासखर्च आणि दिवसभराचा वेळ वाचणार आहे. गावातच बँक खाते उघडता येणार असून, विविध शासकीय योजनांची माहितीही मिळणार आहे.

सायबर भामट्यांकडून बँक खाते हैंक करून फसवणूकीचे अनेक प्रकणे समोर येत आहेत. बँक खाते सुरक्षित कसे ठेवावे, याबाबत माहिती खातेदारांना दिली जाणार आहे. सायबर भामट्यांकडून सामान्यांची फसवणूक केली जात असल्याने जनजागृती केली जाणार आहे.

# संपादकीय

## जोशपर्व रंग भरतेय...

सण केवळ धार्मिक विधींपुरते मर्यादित नसतात, तर इतिहास, परंपरा, सामाजिक एकोपा आणि अर्थव्यवस्थेचेही प्रतीक असतात. प्रभू श्रीरामांनी केलेला रावणाचा वध, देवी दुर्गेने महिषासुरावर मिळवलेला विजय, अन्यायावर न्यायाचा विजय, अशी दसऱ्याची विविध रूपे आहेत. काळानुसार या सणाचे स्वरूप बदलले, तरी विजयाची प्रेरणा, नव्या कार्याचा संकल्प आणि समृद्धीची आकांक्षा हे त्याचे मूलभूत सूत्र आजही कायम आहे. भारत हा विविध भाषा, धर्म, परंपरा आणि संस्कृतींनी नटलेला देश आहे. या वैविध्यातून राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक समृद्धीचे दर्शन घडवणारे अनेक सण देशभर साजरे होतात. दसरा हा त्यापैकी एक महत्त्वाचा सण. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांनंतर येणारी विजयादशमी म्हणजे भक्ती, शक्ती आणि विजय यांचा संगम. समाजातील शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, उद्योजक, कारागीर आणि सामान्य नागरिक अशा प्रत्येक घटकासाठी या दिवसाला वेगवेगळे महत्त्व आहे. घर, वाहन किंवा सोने खरेदी करणे, व्यवसाय सुरू करणे, नवीन यंत्रसामग्री वापरात आणणे, शस्त्रपूजन करणे आणि महत्त्वाच्या कामांचा प्रारंभ करणे अशा विविध कारणांसाठी या दिवसाची निवड केली जाते. त्यामुळे दसऱ्याचा उत्सव मंदिरांपासून बाजारपेठांपर्यंत, घराघरांपासून उद्योगविश्वापर्यंत आणि ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत उत्साहाने साजरा होतो. नवरात्रातील नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते आणि दहाव्या दिवशी तिच्या विजयाचा उत्सव साजरा होतो. व्यक्ती असो किंवा समाज; अहंकार आणि अन्यायापेक्षा विवेक, सहिष्णुता आणि न्याय यांना प्राधान्य दिले पाहिजे, ही दसऱ्याची शिकवण आहे. भारतीय इतिहासात दसऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. घर खरेदी, वाहन खरेदी, व्यवसायाचा प्रारंभ किंवा महत्त्वाच्या गुंतवणुकीसाठी अनेकजण या दिवसाची निवड करतात. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांमध्ये या दिवशी देवीची पूजा, सीमोल्लंघन, आपट्याच्या पानांचे आदानप्रदान आणि शस्त्रपूजन केले जाते. सीमोल्लंघनाची परंपरा गावाच्या किंवा वस्तीच्या सीमेजवळ जाऊन शुभेच्छा आणि विजयाचे प्रतीकात्मक स्मरण करण्याशी संबंधित आहे. ग्रामीण भागात शेतीच्या अवजारांची पूजा केली जाते, तर शहरी भागात वाहनांची आणि कार्यालयीन साधनांची पूजा करण्याचे प्रमाण वाढले आहे. भारताच्या सांस्कृतिक विविधतेमुळे विजयादशमीचे स्वरूप प्रत्येक प्रदेशात वेगवेगळे दिसते. म्हैसूरचा दसरा जगप्रसिद्ध आहे. राजवाड्याची आकर्षक रोषणाई, सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका आणि पारंपरिक सोहळे यामुळे या उत्सवाला विशेष ओळख मिळाली आहे. वाडियार राजघराण्याच्या परंपरेशी जोडलेला हा उत्सव कर्नाटकच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे.

नवरात्र आणि दसऱ्याचा काळ भारतीय बाजारपेठेसाठी महत्त्वाचा खरेदीचा दिवस आहे. शुभ मुहूर्तावर नवीन वस्तू खरेदी करण्याची परंपरा असल्यामुळे ग्राहक या काळात विविध वस्तूंची खरेदी करतात. सोने-चांदी, दुचाकी, मोटारी, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, घरगुती वस्तू, कपडे, फर्निचर आणि बांधकाम क्षेत्रातील वस्तूंना मागणी वाढण्याची शक्यता असते. सोने खरेदीला दसऱ्याच्या दिवशी विशेष महत्त्व असते. अनेक कुटुंबे आर्थिक क्षमतेनुसार सोने किंवा चांदीची नाणी, दागिने अथवा लहान वस्तू खरेदी करतात. सोन्याला परंपरेने समृद्धी आणि सुरक्षित गुंतवणुकीचे प्रतीक मानले जाते. मात्र सोन्याचे दर प्रचंड वाढलेले असल्यास ग्राहक खरेदी कमी करू शकतात किंवा कमी वजनाच्या दागिन्यांना प्राधान्य देऊ शकतात. वाहन उद्योगासाठीही दसरा महत्त्वाचा असतो. नवीन वाहन खरेदीसाठी शुभ दिवस निवडणारे ग्राहक या काळात वाहनांची नोंदणी करतात. वाहन उत्पादक आणि वितरक सवलती, विनिमय योजना आणि वित्तपुरवठ्याच्या सुविधा देतात. त्याचप्रमाणे दूरचित्रवाणी संच, स्मार्टफोन, संगणक, रेफ्रिजरेटर आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या विक्रीसाठीही सणासुदीचा काळ महत्त्वाचा असतो.

ई-कॉमर्स कंपन्यांच्या सणासुदीच्या विक्री मोहिमा आणि डिजिटल पेमेंटच्या वाढत्या वापरामुळे खरेदीच्या पद्धतीत बदल झाला आहे. पूर्वी प्रामुख्याने स्थानिक बाजारपेठांमध्ये होणारी खरेदी आता ऑनलाइन माध्यमांमधूनही केली जाते. ग्राहक दुकानात जाऊन वस्तू पाहतात, ऑनलाइन किंमतींची तुलना करतात आणि सवलतींचा विचार करून निर्णय घेतात. दसऱ्याच्या निमित्ताने होणाऱ्या खरेदीमुळे किरकोळ व्यापार, वाहतूक, गोदामे, जाहिरात, वित्तपुरवठा आणि सेवाक्षेत्राला चालना मिळते. बाजारपेठेत मागणी वाढल्यास विक्रेत्यांची उलाढाल वाढू शकते. या काळात तात्पुरत्या रोजगाराच्या संधीही निर्माण होतात. सणासुदीच्या मागणीचा परिणाम उत्पादन क्षेत्रातील नियोजनावरही होतो. काळानुसार दसऱ्याच्या साजरीकरणात मोठे बदल झाले आहेत. पूर्वी धार्मिक विधी, शस्त्रपूजन, सीमोल्लंघन आणि पारंपरिक भेटीगाठी यांवर भर होता. आता त्यासोबत मोठे सार्वजनिक कार्यक्रम, गरबा, डिजिटल शुभेच्छा, पर्यटन आणि खरेदीच्या विशेष मोहिमा यांची भर पडली आहे. या बदलांमुळे सणाचा आवाका वाढला असला, तरी त्याचा मूळ संदेश विसरता कामा नये. दसरा हा इतरांवर विजय मिळविण्यापेक्षा स्वतःमधील वाईट प्रवृत्तींवर विजय मिळवण्याची आठवण करून देणारा सण आहे. द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, अंधश्रद्धा आणि अहंकार यासारख्या प्रवृत्तींचा त्याग करण्याचा संकल्प या दिवशी केला, तर सणाचे सामाजिक महत्त्व अधिक वाढेल. पर्यावरणपूरक उत्सव, स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन, गरजू व्यक्तींना मदत आणि आर्थिक शिस्त यांचा स्वीकार केल्यास दसऱ्याचा आनंद अधिक व्यापक होऊ शकतो. दसरा हा इतिहास, पौराणिक श्रद्धा, सांस्कृतिक विविधता आणि आर्थिक चैतन्य यांचा सुंदर संगम आहे. श्रीरामांचा विजय असो, देवी दुर्गेचा पराक्रम असो किंवा महाराष्ट्रातील सीमोल्लंघन आणि आपट्याच्या पानांचे सोने; या सर्व परंपरांमधून विजय, समृद्धी आणि नव्या सुरुवातीचा संदेश मिळतो. गरबा आणि आधुनिक खरेदीच्या माध्यमातून या सणाला नवे स्वरूप प्राप्त झाले आहे; मात्र त्याचे खरे महत्त्व केवळ उत्सवाच्या भव्यतेत किंवा बाजारपेठेतील उलाढालीत नसून, समाजातील चांगल्या मूल्यांचा विजय साधण्याच्या संकल्पात आहे. विजयादशमीचा हा संदेश प्रत्येकाने आपल्या जीवनात उतरवला, तर दसरा खऱ्या अर्थाने आनंद, प्रगती आणि सकारात्मक परिवर्तनाचा उत्सव ठरेल.

"चवीचा वारसा अन् विश्वासाची साथ"

# श्री लक्ष्मी फरसाण सेंटरची ८५ वर्षांची यशोगाथा

### १९४० पासून सुरू असलेल्या व्यवसायाची तिसरी पिढी सांभाळतेय धुरा; बाजारपेठेतील छोट्या सुरुवातीपासून ग्राहकांच्या मनातील स्थानापर्यंतचा प्रवास

कोणताही व्यवसाय काळाच्या ओघात केवळ दुकान राहत नाहीत, तर ते परिसराच्या आठवणी, चवीचा वारसा आणि विश्वासाचे केंद्र बनतात. गेल्या ८५ वर्षांपासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले श्री लक्ष्मी फरसाण सेंटर हे त्याचेच उदाहरण आहे. पारंपरिक पद्धतीने सुरू झालेल्या या व्यवसायाची आज तिसरी पिढी जबाबदारीने धुरा सांभाळत आहे. चव, गुणवत्ता आणि ग्राहकसेवेच्या जोरावर मोरे कुटुंबाने व्यवसायाची ओळख कायम ठेवली आहे.

**१९४० मध्ये सुरू झाला चवीचा प्रवास**

''आमचा व्यवसाय १९४० पासून सुरू आहे. सुरुवातीच्या काळात बाजारात दुकानदारी केली. परिसरातील काळूबाळूचे बाजार, यात्रा आणि आठवडे बाजारांमध्ये व्यवसाय केला,'' अशी आठवण शामराव मुरलीधर मोरे (नाना) यांनी सांगितली. त्या काळातील मर्यादित साधनांमधून सुरू झालेला व्यवसाय मेहनत आणि ग्राहकांच्या विश्वासामुळे पुढे विस्तारत गेला. आजही यात्रा आणि आठवडे बाजारातील परंपरा कायम आहे.

**वडिलांचा वारसा जपला, पुढे नेला**

आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असतानाही एकत्रित कुटुंबाच्या सहकार्याने व्यवसाय सुरू राहिला. वडिलांकडून मिळालेला व्यवसायाचा वारसा जपत मोरे कुटुंबाने तो पुढे नेला. ''वडिलांनी उभा केलेला व्यवसाय पुढे चालवण्याची जबाबदारी आम्ही स्वीकारली. ग्राहकांचा विश्वास टिकवणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट राहिले,'' असे मोरे यांनी सांगितले.

**जुन्या चवीसोबत दर्जेदार सेवेचा आग्रह**

सध्या मार्केट यार्डसमोर, नगर-मनमाड रस्त्यावर, शंकर नाना खर्डे चौकात श्री लक्ष्मी फरसाण सेंटर कार्यरत आहे. ''व्यवसायामध्ये आम्ही समाधानी आहोत. ग्राहकांना व्यवस्थित सेवा, चांगली गुणवत्ता आणि विश्वासार्ह पदार्थ देण्यावर नेहमी भर असतो,'' असे त्यांनी सांगितले. महादेव मंदिराजवळील भट्टीमध्ये पारंपरिक पद्धतीने फरसाण तयार केले जाते. दोन कारागीर या कामात योगदान देतात.

**तिसरी पिढीही व्यवसायात सक्रिय**

काळ बदलला, शिक्षणाच्या संधी वाढल्या; तरीही मोरे कुटुंबाने व्यवसायाशी असलेली नाळ कायम ठेवली आहे. तिसरी पिढीही या व्यवसायात सक्रिय असून, कुटुंबातील स्वप्नील यांनी हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेतले आहे. ते व्यवसायाची जबाबदारी सांभाळत आहेत. ''नवीन व्यवसाय सुरू करण्यापेक्षा आपला व्यवसाय अधिक चांगल्या पद्धतीने कसा करता येईल, ग्राहकांना अधिक चांगली सेवा कशी देता येईल, यावर आमचा भर आहे,'' असे मोरे यांनी सांगितले.

**कुटुंबाची साथ ठरली ताकद**

व्यवसायाच्या यशामध्ये कुटुंबाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे ते सांगतात. भाऊ, महिलावर्ग आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे व्यवसायाची वाटचाल सुरळीत सुरू आहे. कर्मचाऱ्यांशीही कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वागणूक ठेवली जाते. त्यामुळे व्यवसायात आपुलकीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**तरुणांनी आवडीच्या व्यवसायाकडे वळावे**

आज अनेक तरुण नोकरीच्या मागे धावताना दिसतात. मात्र स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात व्यवसाय करण्याची संधी त्यांनी शोधली पाहिजे, असा संदेश शामराव मोरे देतात. ''मनापासून आवडणारा व्यवसाय केला तर त्यामध्ये समाधान मिळते. व्यवसायात मेहनत, संयम आणि सातत्य ठेवले तर यश नक्की मिळते,'' असे त्यांनी सांगितले.

**परंपरेची चव, विश्वासाची ओळख**

१९४० मध्ये सुरू झालेला श्री लक्ष्मी फरसाण सेंटरचा प्रवास आज तिसऱ्या पिढीपर्यंत पोहोचला आहे. बदलत्या काळातही पारंपरिक चव, दर्जेदार पदार्थ आणि ग्राहकांशी असलेले विश्वासाचे नाते जपत हा व्यवसाय पुढे जात आहे. आठ दशकांहून अधिक काळ ग्राहकांच्या जिभेवर आणि मनात स्थान निर्माण करणारा श्री लक्ष्मी फरसाण सेंटरचा प्रवास म्हणजे मेहनत, परंपरा आणि विश्वासाच्या जोरावर उभी राहिलेली प्रेरणादायी यशोगाथा आहे.



शामराव मोरे (नाना)







पान १ वरून

## जलसंधारणासाठी गावनिहाय आराखडा तयार करा

प्रश्नांकडे मंत्र्यांचे लक्ष वेधत निवेदन सादर केले. यावर्षी अत्यल्प पर्जन्यमानामुळे कोपरगाव तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश झाला आहे. तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये कमी व अनियमित पाऊस, भूजल पातळीत सातत्याने होणारी घट, अपुरा जलसाठा आणि सिंचनाच्या मर्यादित सुविधा यामुळे शेती व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे. तालुक्यातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून असल्याने पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे ही काळाची गरज असल्याचे आ. कोल्हे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

यासाठी गावनिहाय नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती व मजबुतीकरण, सिमेंट आणि माती नाला बांधांची उभारणी, पाझर तलाव व लघु जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन तसेच जलसाठ्यांमधील गाळ काढण्याची कामे प्राधान्याने हाती घेण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

त्याचबरोबर शेततळी, जलपुनर्भरण संरचना, सलग समतल चर, समतल बांध आणि समोच्च रेषांवरील बांधबंदिस्ती यांसारख्या उपाययोजनांद्वारे पावसाचे पाणी अडवून जमिनीत जिरविण्यावर भर देण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, आ. कोल्हे यांच्या निवेदनाची दखल घेत मंत्री संजय राठोड यांनी सकारात्मक भूमिका घेतली. संबंधित विभागाच्या माध्यमातून प्रस्तावित कामांचा आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही व सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. त्यामुळे कोपरगाव तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रत्येक गावाची भौगोलिक परिस्थिती, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक गरजा वेगवेगळ्या असल्याने एकत्रित नियोजनाऐवजी गावनिहाय स्वतंत्र मृद व जलसंधारण विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. या आराखड्यातील कामांना तातडीने मंजुरी देऊन त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच संबंधित विभागाला आवश्यक आदेश देऊन प्रत्यक्ष कामांना गती द्यावी, असे आ. विवेक कोल्हे म्हणाले.

## कौटुंबिक वादातून मुलाने केला वडिलांचा खून

वादानंतर फावड्याने केला हल्ला

२ नोव्हेंबर रोजी जगन्नाथ होडे आणि रामचंद्र यांच्यात कौटुंबिक कारणावरून वाद झाला. वाद वाढल्यानंतर संतापलेल्या रामचंद्रने घरातील फावडे घेऊन वडिलांच्या डोक्यावर वार केले. या हल्ल्यात जगन्नाथ होडे गंभीर जखमी झाले.

जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने कुटुंबीयांनी त्यांना पुढील उपचारासाठी चिपळूण येथे नेले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

चिपळूण पोलिसांकडून मिळाली माहिती

घटनेची माहिती चिपळूण पोलिसांनी पुणे पोलिसांना दिल्यानंतर पर्वती पोलिसांनी कारवाई केली. रामचंद्र होडे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रकाश खिलारी करत आहेत. दरम्यान, कौटुंबिक वादातून वृद्ध वडिलांचा जीव गेल्याने जनता वसाहत परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## ऊसतोड कामगारांसोबत आ. राजळेंची दिवाळी

कुटुंबीयांची विचारपूस केली. तसेच नारायण दहिफळे यांच्या पालालाही भेट देऊन त्यांच्या कुटुंबातील सदस्यांशी प्रापंचिक अडचणी आणि विविध समस्यांबाबत चर्चा केली.

यावेळी कामगारांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न आणि मुलींच्या बालविवाहाची समस्या यावर त्यांनी विशेष लक्ष वेधले. मुलींचे वयाच्या १८ वर्षांपूर्वी लग्न करू नका. त्यांना उच्च शिक्षण द्या, स्वतःच्या पायावर उभे करा आणि स्वावलंबी बनवा. आज ऊसतोड कामगार महिलांना ज्या कष्टमय परिस्थितीचा सामना करावा लागत आहे, ती परिस्थिती आपल्या मुलींच्या वाट्याला येऊ नये, यासाठी पालकांनी मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर बोलताना आमदार राजळे म्हणाल्या की, शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यांतील पाणीटंचाई गंभीर असून पाथर्डी तालुक्यात १००, तर शेवगाव तालुक्यात ३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने अग्रिम मदत म्हणून पाच हजार रुपयांची रक्कम शेवगाव-पाथर्डीतील सुमारे सव्वा लाख लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा केली आहे.

दुष्काळाचे संकट केवळ दोन महिन्यांचे नसून पुढील पावसाळ्यापर्यंत त्याचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीही शासन प्रयत्नशील आहे. शासनाकडून मिळणारी पाच हजार रुपयांची मदत ही गुलाबाच्या पाकळीसारखी असली, तरी शासन शेतकरी आणि कष्टकरी कामगारांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब किलबिले, संचालक राहुल राजळे, उद्धव वाघ, श्रीकांत मिसाळ, रामकिसन काकडे, बाळासाहेब गोल्हार, नारायण काकडे, सचिन लोखंडे, कुशीनाथ बर्डे, बापूसाहेब पाटेकर, दीपक अंदुरे, रवींद्र महाजन, विनायक म्हस्के आदी उपस्थित होते.

ऊसतोड कामगारांना सहा महिने घरदार सोडून ऊन-पावसात कष्ट करावे लागतात. या कष्टमय जीवनाची झळ त्यांच्या मुलांच्या शिक्षणाला बसू नये, यासाठी पालकांनी विशेष काळजी घ्यावी. मुलींना उच्च शिक्षण देऊन स्वावलंबी बनवा. वयाच्या १८ वर्षांपूर्वी त्यांचे लग्न करू नका. दुष्काळाच्या संकटात शासन शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या पाठीशी असून पाणी व पशुधनाच्या प्रश्नांबाबतही पाठपुरावा सुरू आहे, असे आ. मोनिका राजळे म्हणाल्या.

पान १ वरून

## दीपावली हे आनंद अन् बंधुभावाचे पर्व

जपली पाहिजे. दुष्काळी तालुक्यापासून प्रगतशील तालुक्यापर्यंतच्या संगमनेरच्या वाटचालीत जुन्या पिढीचे मोठे योगदान आहे.

सहकारी साखर कारखान्याने कायम तालुक्याचे हृदय म्हणून काम केले आहे. दुष्काळी भागात कारखाना सुरू झाल्यानंतर सिंचनासाठी पाईपलाईनचे जाळे निर्माण झाले, ऊस क्षेत्र वाढले आणि वीज जोडण्यांची संख्या वाढली. शेतकऱ्यांच्या कष्टातूनच या भागाची प्रगती झाली. निळवंडे धरण आणि कालव्यांची कामे पूर्ण झाली असून, यंदा धरण भरले आहे. मात्र, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे चारा आणि पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. येणाऱ्या संकटातून सावरण्याची शक्ती सर्वांना मिळो, अशी प्रार्थनाही त्यांनी केली.

अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्थांनी शेतकरी, उत्पादक आणि कामगारांना विविध देयके अदा केल्यामुळे बाजारपेठेत आर्थिक उलाढाल वाढली आहे. सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत असल्यामुळे शहराची बाजारपेठही सक्षम झाली आहे. सर्वांनी आनंदाचा हा सण प्रदूषणविरहित पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन करत त्यांनी जुन्या दिवाळीच्या आठवणींनाही उजाळा दिला.

कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी घालून दिलेल्या शिस्तीच्या पायावर कारखान्याची वाटचाल सुरू आहे. बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली प्रतिकूल परिस्थितीतही कारखान्याने चांगली प्रगती केली आहे. सध्या कारखान्याच्या प्रतिदिन ९ हजार मेट्रिक टन गाळप क्षमतेच्या विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. चालू हंगामात कारखान्याने ८५ लाख युनिट वीज वितरित केली आहे. तसेच दीपावलीनिमित्त शेतकरी सभासद आणि कामगारांच्या खात्यांवर सुमारे २२ कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत.

कार्यक्रमाचे आभार अमोल दिघे यांनी मानले. यावेळी विविध विभागांचे प्रमुख, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. थोरात यांनी दिला समतेचा संदेश :** कारखान्याच्या लक्ष्मीपूजनानिमित्त प्रा. विनोद राऊत आणि सहकाऱ्यांचा भजन प्रभात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संत तुकाराम, संत चोखामेळा यांच्यासह विविध संतांची अभंगरचना सादर करण्यात आली. संत कबीरांच्या गीतांतून समता आणि मानवतेचा जागर करण्यात आला. कबीरवाणीतील विविध गीतांचा अर्थ विशद करत डॉ. जयश्रीताई थोरात यांनी संत कबीरांचा मानवता, बंधुभाव आणि समतेचा विचार उपस्थितांसमोर मांडला.

# विहिरीत सापडले आठ दुचाकींचे सांगाडे

### भगवानगडाच्या पायथ्याशी दुचाकींचे गूढ; धक्कादायक प्रकार उघड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील भगवानगडाच्या पायथ्याशी पारगाव रस्त्यालगत असलेल्या जुन्या विहिरीत तब्बल आठ दुचाकींचे सांगाडे आणि अवशेष आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. विहिरीतील पाणी आटल्याने गाळ काढण्याचे काम सुरू असताना हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. यामध्ये दोन दुचाकींचे पूर्ण सांगाडे, तर अन्य सहा दुचाकींचे सांगाडे व सुटे भाग आढळले आहेत. पोलिसांनी हे सर्व अवशेष ताब्यात घेतले आहेत.

भगवानगडाला पाणीपुरवठा करण्यासाठी या जुन्या विहिरीचा वापर केला जात होता. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे विहिरीतील पाणी आटल्याने तळाशी मोठ्या प्रमाणात गाळ साचला होता. त्यामुळे विहिरीतील गाळ उपसण्याचे काम सुरू करण्यात आले होते. हे काम सुरू असताना कामगारांना अचानक दुचाकींचे सांगाडे आणि सुटे भाग दिसून आले. एकापाठोपाठ एक असे आठ दुचाकींचे अवशेष आढळल्याने कामगारांनाही आश्चर्याचा धक्का बसला. तत्काळ पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली.



पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सर्व अवशेष ताब्यात घेतले.

विहिरीत आढळलेल्या दुचाकींची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. अनेक वर्षे पाण्यात आणि गाळात पडून राहिल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात गंज चढला आहे. काही दुचाकींचे केवळ सांगाडे शिल्लक राहिले असून, काहींचे सुटे भागही गंजून गेले आहेत. प्राथमिक पाहणीत या दुचाकी हिरो होंडा आणि बजाज कंपनीच्या असाव्यात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, त्यांची नेमकी ओळख पटविणे कठीण झाले आहे.

दरम्यान, या दुचाकी चोरीच्या असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चोरी केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्या विहिरीत टाकण्यात आल्या असाव्यात, असा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, याबाबत पोलिसांकडून अद्याप अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. या दुचाकी नेमक्या कोणाच्या आहेत, त्या किती वर्षांपूर्वी विहिरीत टाकण्यात आल्या आणि त्यांचा दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांशी काही संबंध आहे का, याचा तपास आता पोलिसांसमोर आहे. या घटनेमुळे भगवानगड परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

# दक्षिणेत 'कपबशी'चा वरचष्मा; 'छत्री'ची काही तालुक्यांत दमदार एन्ट्री

## जिल्हा बँक निवडणूक : विखे–थोरात युतीला सहकाराचा कौल; लंके पॅनलने नगर, श्रीगोंदा, जामखेड–कर्जतमध्ये दाखवली ताकद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीतून दक्षिण भागातील सहकाराचे राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे. विखे–थोरात युतीच्या 'कपबशी' पॅनलने दक्षिण भागातील बहुतांश तालुक्यांत आघाडी घेत सहकार क्षेत्रातील आपली पकड कायम असल्याचे दाखवून दिले, तर खासदार निलेश लंके यांच्या 'छत्री' पॅनलने काही महत्त्वाच्या तालुक्यांत प्रभावी कामगिरी करत आगामी राजकीय समीकरणांची चाहूल दिली आहे.

जिल्हा बँकेचे मतदार हे सर्वसामान्य मतदार नसले, तरी सहकारी संस्थांशी जोडलेले प्रतिनिधी असल्याने प्रत्येक मतदाराचा गावपातळीवर मोठा प्रभाव मानला जातो. त्यामुळे या निवडणुकीतील तालुकानिहाय आकडेवारीकडे आगामी राजकीय घडामोडींचा संकेत म्हणून पाहिले जात आहे.

भटक्या–विमुक्त मतदारसंघात चुरस; छत्रीला काही तालुक्यांत बळ




भटक्या–विमुक्त जाती–जमाती प्रतिनिधी मतदारसंघात कपबशीचे सांगळे गणपतराव पुंजाजी यांना २ हजार ४६१ मते, तर छत्रीचे ढाकणे ऋषिकेश प्रताप यांना १ हजार २८७ मते मिळाली.

दक्षिण भागात छत्री पॅनलने नगर (२१५), श्रीगोंदा (१५२), पारनेर (१२२), कर्जत (१०९) आणि जामखेड (७६) या तालुक्यांत चांगली कामगिरी केली. मात्र कोपरगाव (४००), संगमनेर (६२३), राहुरी (१६२), नेवासा (१५५), श्रीरामपूर (९४) या भागांत कपबशीने मोठी आघाडी घेतली.

**अनुसूचित जाती–जमाती मतदारसंघात कपबशीची मोठी आघाडी**

अनुसूचित जाती–जमाती प्रतिनिधी मतदारसंघात कपबशीचे वैभव पिचड यांनी २ हजार ६९० मते मिळवून स्पष्ट आघाडी घेतली, तर छत्रीचे प्रशांत लोखंडे यांना १ हजार ८६ मते मिळाली.

दक्षिण भागातील नगर (२४२), नेवासा (१७०), पारनेर (११९), पाथर्डी (१०५), राहुरी (१६९), श्रीगोंदा (१९५), शेवगाव (१०७) या तालुक्यांत कपबशीला मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला. जामखेड आणि कर्जत येथे मात्र छत्रीने तुल्यबळ लढत दिली.

**महिला राखीवमध्येही युतीची सरशी**

महिला राखीव मतदारसंघात कपबशीच्या अनुराधा नागवडे यांना २ हजार ६४१, तर संगीता वाघ यांना २ हजार २९२ मते मिळाली. छत्रीच्या हर्षदा काकडे यांना १ हजार ४८९, तर संध्या महांडुळे यांना ४६४ मते मिळाली.

महिला मतदारसंघातही दक्षिण भागातील बहुतांश तालुक्यांत कपबशी पॅनलने आघाडी राखली. श्रीगोंदा, पारनेरसह काही भागांत छत्रीने मात्र आपली उपस्थिती जाणवून दिली.

**सहकाराच्या मैदानातील ताकदीचे दर्शन**

जिल्हा बँक निवडणुकीतील मतदान हे थेट जनतेच्या राजकीय कलाचे प्रतिबिंब नसले, तरी सहकार क्षेत्रातील संघटनात्मक ताकद, संस्थांवरील प्रभाव आणि स्थानिक नेतृत्वाची पकड याचे महत्त्वाचे मोजमाप मानले जाते.

दक्षिण भागातील आकडेवारीनुसार विखे–थोरात युतीने सहकारातील आपला गड कायम राखला आहे, तर खासदार निलेश लंके यांच्या पॅनलने नगर, श्रीगोंदा, जामखेड आणि कर्जतसारख्या भागांत प्रभाव निर्माण करत आगामी राजकीय संघर्षाची नांदी दिली आहे.

### दक्षिण भागाचा कौल

कपबशीचा प्रभाव : राहुरी, नेवासा, पाथर्डी, शेवगाव, श्रीरामपूर, पारनेरच्या अनेक भागांत आघाडी.

**छत्रीची ताकद** : नगर, श्रीगोंदा, जामखेड, कर्जत येथे लक्षणीय मतदान.

सहकारातील समीकरण : विखे–थोरात

**युतीचे वर्चस्व कायम;** लंके गटाचा विस्ताराचा प्रयत्न स्पष्ट.

# राष्ट्रवादीच्या भवितव्यावरून राजकीय चर्चांना वेग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव** : महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमधील भविष्यातील समीकरणांबाबत पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. भाजप, राष्ट्रवादीचे दोन्ही गट आणि पवार कुटुंबातील अंतर्गत राजकीय घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणातील पुढील दिशा काय असेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात काही निर्णयांवरून अंतर्गत मतभेद असल्याची चर्चा आहे. पक्षातील काही नियुक्त्या आणि संघटनात्मक निर्णयांवरून काही ज्येष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे बोलले जात आहे. मात्र, पक्षातील निर्णय प्रक्रियेवर युवा नेतृत्वाचा प्रभाव वाढत असल्याचेही चित्र आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. केंद्रातील राजकीय समीकरणे, आगामी निवडणुका आणि राष्ट्रीय स्तरावरील संख्याबळाच्या पार्श्वभूमीवर या शक्यतेकडे पाहिले जात आहे. मात्र, शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या भूमिकेमुळे हे समीकरण सहज साध्य होणार नसल्याचेही राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केल्याची घटना चर्चेचा विषय ठरली आहे. या संवादाकडे केवळ सदिच्छा भेट म्हणून पाहायचे की त्यामागे राजकीय संकेत आहेत, यावर राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क सुरू आहेत.

दुसरीकडे अजित पवार गटात नेतृत्व, संघटनात्मक बांधणी आणि आगामी राजकीय रणनीती यावरून हालचाली सुरू असल्याचे चित्र आहे. पक्षाचा पारंपरिक मतदार पुन्हा जोडण्यासाठी विविध पर्यायांवर विचार सुरू असल्याची चर्चा आहे.

एकूणच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे भवितव्य, पवार कुटुंबातील राजकीय भूमिका आणि भाजपसोबतच्या संभाव्य समीकरणांवर महाराष्ट्राच्या राजकारणाची पुढील दिशा अवलंबून राहणार आहे.

# राष्ट्रवादी विलिनीकरणाची चर्चा; 'हूल' कुणाच्या राजकीय फायद्यासाठी?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चेने राज्याच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा उत्सुकता निर्माण केली आहे. मात्र, या चर्चेची प्रतीक्षा राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांतील नेते आणि कार्यकर्त्यांपेक्षा बाहेरील राजकीय घटकांमध्ये अधिक असल्याचे चित्र आहे. ठोस राजकीय हालचालींचा अभाव असताना अचानक या चर्चेला वेग का आला, याबाबत आता प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या फुटीनंतर शरद पवार आणि अजित पवार असे दोन राजकीय प्रवाह निर्माण झाले. त्यानंतर दोन्ही गटांनी स्वतंत्र संघटनात्मक वाटचाल सुरू केली. मात्र, अलीकडील काही भेटीगाठी, नेत्यांची वक्तव्ये आणि राजकीय घडामोडींमुळे पुन्हा एकदा विलिनीकरणाच्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

या चर्चेला सुरुवात नेमकी कुठून झाली, यावर राजकीय निरीक्षकांचे लक्ष आहे. काही नेत्यांच्या विधानांमुळे आणि भेटींमुळे तर्कवितर्कांना उधाण आले असले, तरी प्रत्यक्षात दोन्ही पक्षांच्या पातळीवर विलिनीकरणाचा कोणताही अधिकृत निर्णय झालेला नाही. यापूर्वीही अशाच प्रकारच्या चर्चांनंतर दोन्ही गटांनी आपापल्या भूमिका स्पष्ट केल्या होत्या.

**राजकीय समीकरणांवर परिणामाची उत्सुकता**

राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्यास महाराष्ट्राच्या राजकारणातील समीकरणांमध्ये मोठा बदल होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे विरोधक, मित्रपक्ष आणि राजकीय विश्लेषक या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. मात्र, राष्ट्रवादीतील नेत्यांकडून अद्याप कोणतीही स्पष्ट दिशा देण्यात आलेली नाही.

राजकारणात अनेकदा अशा प्रकारच्या चर्चा विशिष्ट हेतूने पुढे आणल्या जातात. कधी पक्षांतर्गत दबाव निर्माण करण्यासाठी, तर कधी राजकीय वातावरणाची चाचपणी करण्यासाठी अशा बातम्यांना हवा दिली जाते. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेबाबतही नेमका उद्देश काय आहे, यावर सध्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

**कार्यकर्त्यांमध्ये मात्र संभ्रम**

दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये या चर्चेबाबत मोठी हालचाल दिसून येत नाही. स्थानिक पातळीवरील नेते आगामी राजकीय आव्हाने, संघटन बांधणी आणि निवडणूक तयारीवर अधिक लक्ष केंद्रित करत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा ही प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेचा भाग आहे की केवळ राजकीय वातावरण तापविणारी 'हूल', याचे उत्तर आगामी काही दिवसांतील घडामोडींमधूनच स्पष्ट होणार आहे. सध्या मात्र या चर्चेने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण केली असून, निर्णयापेक्षा चर्चेलाच अधिक महत्त्व मिळाल्याचे चित्र आहे.

# दिवाळीतच 'नळ कोरडे'; स्वाभिमानी श्रीरामपूरकर म्हणून मिरवणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर सवाल

## ''सणाच्या दिवशी नागरिकांना पाण्यासाठी धावपळ; आत्मपरीक्षणाची वेळ'' अविनाश नागरे यांचा हल्लाबोल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : वर्षभर ३६५ दिवस नियमित पाणीपुरवठा करणारे शहर म्हणून ओळख असलेल्या श्रीरामपूरमध्ये दिवाळीच्या दिवशीच पाणीपुरवठा विस्कळित झाल्याने सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ''स्वाभिमानी श्रीरामपूरकर म्हणून मिरवणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या काळातच ऐन दिवाळीत नागरिकांना पाण्यासाठी धावपळ करावी लागली,'' अशी टीका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अविनाश नागरे यांनी केली.

''महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या सणाच्या दिवशीच शहरवासीयांना पाण्यासाठी टँकरचा आधार घ्यावा लागला. ही बाब सत्ताधाऱ्यांनी आत्मपरीक्षण करण्याची आहे. जनतेच्या रोषाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी,'' असा घणाघात नागरे यांनी केला.

नागरे म्हणाले, ''अनुराधाताई आदिक नगराध्यक्षा असताना दिवाळी, रमजान महिन्यासह नाताळ आणि इतर सर्व धर्मियांच्या सणांच्या काळात पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यात आला होता. कोविडसारख्या कठीण काळातही नागरिकांना पाण्यासाठी त्रास होऊ दिला नाही. मात्र सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या कारभारामुळे यंदा दिवाळीच्या दिवशीच नागरिकांना पाण्यासाठी धावपळ करावी लागली.''

**५२ दिवसांचे रोटेशन; तरीही नियोजन कोठे?**

पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर सवाल उपस्थित करताना नागरे म्हणाले, ''कॅनॉलला सुमारे ५२ दिवस पाण्याचे रोटेशन सुरू होते. या कालावधीत शहरातील



पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करता आले असते. मात्र रोटेशन सुरू असतानाच मुरूम काढण्याच्या कामाला प्राधान्य देण्यात आले. नागरिकांच्या मूलभूत गरजांपेक्षा इतर कामांना महत्त्व का दिले गेले, याचे उत्तर सत्ताधाऱ्यांनी द्यावे.''

**टँकरवर स्वतःच्या नावाचे फलक पण नळातून पाणी नाही?**

पालिकेच्या टँकर पाणीपुरवठ्यावरही नागरे यांनी टीका केली. ''पालिकेच्या टँकरवर स्वतःच्या नावाचे बोर्ड आणि बॅनर लावून पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र तेच पाणी नियोजन करून नळाद्वारे प्रत्येक नागरिकाच्या घरापर्यंत का पोहोचवता येत नाही? प्रसिद्धीपेक्षा कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याचे नियोजन आवश्यक आहे,'' असे त्यांनी सांगितले.

**वीजपुरवठ्याच्या प्रश्नावरही सत्ताधाऱ्यांना घेरले**

नळाला पाणी येण्याच्या वेळेत अनेक भागांत वीज नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. ''महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन सूचना दिल्या जातात; मात्र प्रत्यक्ष परिस्थितीत बदल होत नाही. सत्ताधाऱ्यांचा आपल्या यंत्रणेवर किती अंकुश आहे, हा प्रश्न निर्माण होतो,'' अशी टीका नागरे यांनी केली.

**दिवाळीत महिलांची पाण्यासाठी धावपळ**

दिवाळीसारख्या सणाच्या दिवशी पाणी नसल्याने महिलांना मोठा त्रास सहन करावा लागल्याचे नागरे यांनी सांगितले. ''सामान्य नागरिकांना पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभे राहावे लागते. मात्र निर्णय घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांना या अडचणींची जाणीव होत नाही. सोशल मीडियावरील प्रसिद्धीपेक्षा नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज आहे,'' असे ते म्हणाले.

दरम्यान, स्वाभिमानी श्रीरामपूरकर म्हणून मिरवणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आता प्रत्यक्ष जनतेच्या समस्या समजून घेऊन पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर कराव्यात. भविष्यात सणासुदीच्या काळात नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागू नये, यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

# काष्टीत कत्तलीपूर्वीच ६२ गोवंशीय जनावरांची सुटका



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या ६२ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका केली. श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे रविवारी (दि. ८) करण्यात आलेल्या कारवाईत तीन चारचाकी वाहनांसह सुमारे २८ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दौंड येथील एका संशयितविरुद्ध श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक जिल्ह्यातील अवैध व्यवसायांची माहिती घेत होते.

यावेळी काष्टी परिसरात कत्तलीच्या उद्देशाने गोवंशीय जनावरे बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीगोंदा पोलिसांच्या मदतीने काष्टी–दौंड रस्त्यालगत संदिप पाचपुते यांच्या गोठ्याजवळ तसेच नवीन पेट्रोल पंपाच्या संरक्षक भिंतीच्या आडोशाला छापा टाकला.

या कारवाईत तेथे ६२ गोवंशीय जनावरे आढळून आली. त्यामध्ये गायी, गोऱ्हे आणि कालवडींचा समावेश होता. ही जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी सर्व जनावरांची सुटका करून तीन चारचाकी वाहने ताब्यात घेतली.

या प्रकरणी फैजान ऊर्फ अबुझर अब्दुलहक कुरेशी (रा. खाटीक गल्ली, दौंड, जि. पुणे) याच्याविरुद्ध श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागविणे प्रतिबंधक कायद्यानुसार ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक विकास जाधव व त्यांच्या पथकाने श्रीगोंदा पोलिसांच्या सहकार्याने केली. पुढील तपास श्रीगोंदा पोलिस करीत आहेत.

### गोवंश तस्करीविरोधात एलसीबीचा धडाका

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने कारवाई सुरू आहे. गोवंश तस्करी, अवैध वाहतूक आणि इतर गैरप्रकारांवर लक्ष ठेवून संशयितांवर कारवाईचा वेग वाढविण्यात आला आहे.

# सेवेतील शिलेदारांसाठी कृतज्ञतेची दिवाळी पहाट

## पोलीस, डॉक्टर्स आणि पत्रकारांचा सुरेल मैफलीत गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव** : समाजाच्या सुरक्षिततेसाठी रात्रंदिवस कर्तव्य बजावणारे पोलीस, आरोग्यसेवेत योगदान देणारे डॉक्टर्स आणि समाजातील प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणारे पत्रकार यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पुण्यात 'कृतज्ञतेची दिवाळी पहाट' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.

केअर संस्था आणि श्रमिक पत्रकार संघ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ५) सकाळी बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला मोठी उपस्थिती होती. सेवाभावी वृत्तीने वर्षभर कार्य करणाऱ्या या तीनही घटकांचा सन्मान करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. दिवाळीच्या मंगलमय पहाटे भारतीय अभिजात संगीताच्या सुरांनी वातावरण प्रसन्न झाले. निखिल पटवर्धन यांच्या सतारवादनाने आणि एनोदिन वारसी यांच्या बासरीवादनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. राहुल आचार्य आणि खंडेराव मुळे यांच्या तबलावादनाने मैफलीला रंगत आणली.

स्वतःच्या कौटुंबिक आनंदापेक्षा सामाजिक जबाबदारीला प्राधान्य देत काम करणाऱ्या पोलीस, डॉक्टर्स आणि पत्रकार बांधवांनी कुटुंबीयांसह या कार्यक्रमाचा आनंद घेतला. सेवाकार्याचा गौरव आणि कृतज्ञतेचा भाव यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या वेळी प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले, माजी पोलीस महासंचालक भगवंतराव मोरे, श्रीगोंद्याचे आमदार विक्रमदादा पाचपुते, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणेश मंडळाचे अध्यक्ष संजीव जावळे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश शेळके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केअर संस्थेचे सचिव डॉ. महेश वडदरे आणि आकाशवाणीच्या निवेदिका प्रज्ञा डांगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रणव चुनके, योगिनी कोठाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. मयूर वारेगावकर, जया ठेंगे आणि डॉ. भाग्यश्री पायगुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सेवेचा सन्मान आणि संगीताची सुरेल साथ यामुळे 'कृतज्ञतेची दिवाळी पहाट' हा उपक्रम उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.

# दुष्काळात शेतकऱ्यांना सेवा संस्थांचाच आधार : प्रकाश शिंदे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक आधार देतानाच सभासदांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या डिकसळ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेने यंदा सभासदांना १५ टक्के लाभांशाचे वाटप केले. संस्थेचा अ वर्ग दर्जा, शंभर टक्के कर्जवसुली आणि शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमुळे संस्थेने सहकार क्षेत्रात आपली विश्वासार्हता निर्माण केली आहे. दरम्यान, जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल प्रकाश शिंदे व डॉ. पंढरीनाथ गोरे यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे माजी चेअरमन तात्यासाहेब वडवकर होते. प्रारंभी सचिव अरुण लाढाने यांनी संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेतला. शेतकऱ्यांना वेळेवर कर्जपुरवठा करणे, कर्जाची शंभर टक्के वसुली राखणे आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ सभासदांपर्यंत पोहोचविण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक खेडकर यांनी सहकारी संस्थांचे



ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्व अधोरेखित केले. शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात सेवा संस्था हक्काची आधारव्यवस्था ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. संपतराव बावडकर यांनी संस्थेच्या प्रगतीत सभासदांचे योगदान महत्त्वाचे असून, सभासदांनी संस्थेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन केले.

डॉ. पंढरीनाथ गोरे यांनी सहकार क्षेत्रातील जबाबदारी पार पाडताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकजुटीने काम करण्याची गरज व्यक्त केली. चेअरमन अशोकराव लाढाने यांनी संस्थेच्या माध्यमातून सभासदांना भविष्यातही अधिकाधिक लाभ देण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही दिली.

# दिवाळीत भेसळीवर अन्न प्रशासनाचा दणका

## नाशिक विभागात १२० अन्न आस्थापनांचे परवाने निलंबित; ३.७८ कोटींचा साठा जप्त; अहिल्यानगरात १० ठिकाणी कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाशिक** : दिवाळीच्या सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या भेसळखोरांवर अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई केली आहे. नाशिक विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये राबविलेल्या विशेष मोहिमेत २२ दिवसांत १२० अन्न आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, दोन लाख २७ हजार किलो अन्नपदार्थांचा ३ कोटी ७८ लाख रुपयांहून अधिक किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अन्नसुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे आणि सहआयुक्त मंगेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली 'सण–उत्सव विशेष मोहीम २०२६' राबविण्यात आली. १६ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांतील मिठाई दुकाने, खाद्यतेल विक्रेते, मसाले उत्पादक, फरसाण व्यावसायिक तसेच विविध अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली.

नाशिकमध्ये सर्वाधिक कारवाई; अहिल्यानगरातील १० आस्थापने रडारवर

या मोहिमेत नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक ६५ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. जळगावमध्ये २३, धुळ्यात १३, अहिल्यानगरमध्ये १०, तर नंदुरबारमध्ये नऊ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले. तपासणीदरम्यान मिठाई, चिवडा, फरसाण, खाद्यतेल, मसाले, खवा, मावा, बटर, पॅकेज्ड पिण्याचे पाणी आणि भगर यांसह विविध अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

खाद्यतेल, मिठाईतील त्रुटी उघड

तपासणीमध्ये खाद्यतेलाच्या रिपॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या डब्यांचा पुन्हा वापर होत असल्याचे आढळले. काही ठिकाणी पॅकिंगवरील माहितीमध्ये नियमांचे उल्लंघन करण्यात आले होते. 'फोर्टिफाइड ऑइल' असा दावा करण्यात आला असला तरी त्यासाठी आवश्यक परवाने उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.

मिठाईमध्ये विहित मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात खाद्यरंगाचा वापर होत असल्याचेही तपासणीत समोर आले. काही ठिकाणी अन्नपदार्थांची निर्मिती व साठवणूक अस्वच्छ वातावरणात केली जात असल्याचे आढळून आले. तसेच चुकीचे लेबलिंग आणि ब्रँडिंग करून ग्राहकांची दिशाभूल केल्याचे प्रकारही उघडकीस आले.

गुणवत्तेबाबत तडजोड नाही

सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी ही मोहीम राबविण्यात आली. अन्नपदार्थांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि स्वच्छतेच्या निकषांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# पर्याय चॉकलेट वॅक्सचा

शरीरावरील अनावश्यक लव काढून टाकण्यासाठी वॅक्सिंगचा पर्याय निवडला जातो. मात्र साखरेच्या वॅक्ससोबतच अलिकडे चॉकलेट वॅक्स हा प्रकारही प्रचलित आहे. चॉकलेट वॅक्सच्या लाभांविषयी...

* साखरेच्या वॅक्समध्ये लिंबू, मधासारखे घटक असतात. हे घटक त्वचेला तजेला देतात. पण चॉकलेट वॅक्समध्ये कोको, सोयाबिन ऑईल, बदामाचं तेल, ग्लिसरिन, विविध प्रकारची जीवनसत्त्वं, ऑलिव्ह ऑईल असे घटक असतात. त्यामुळे चॉकलेट वॅक्समुळे त्वचेला जास्त पोषण मिळतं.

* कोरडी आणि संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी चॉकलेट वॅक्स करून घ्यायला हवं.

* चॉकलेट वॅक्समध्ये एसेन्शियल ऑईल्स असतात. यामुळे वॅक्सिंगनंतर त्वचा छान तजेलदार दिसते.

**ब्युटी टॉक**

* उन्हामुळे त्वचा टॅन झाली असेल तर चॉकलेट वॅक्सचा पर्याय निवडा. यामुळे त्वचा उजळ दिसू लागते.

* चॉकलेट वॅक्समुळे वॅक्सिंग करताना होणाऱ्या वेदनांची तीव्रता कमी होते.

* काही वेळा साध्या वॅक्सिंगमध्ये अंगावरची लव पटकन निघत नाही. पण चॉकलेट वॅक्समुळे एकाच प्रयत्नात लव निघून जाते आणि तुमची त्वचाही छान मुलायम होते.

* वॅक्सिंग केल्यानंतर चॉकलेट वॅक्सचा मंद सुगंध दरवळू लागतो. हा सुगंध बराच वेळ टिकून रहातो. त्यामुळे आपल्याला ताजंतवानं वाटतं.

**सध्या महिला सक्षमीकरणासाठी नानाविध पातळीवर प्रयत्न होताना दिसतात. त्यांना समाजात सन्मान, मानाचे स्थान आणि सर्व पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाव्या, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. असे असताना आकुर्ली मुंबई मेट्रो स्टेशन हे स्त्रीशक्ती आणि सक्षमीकरणाचे एक अनोखे उदाहरण म्हणून लक्षात घ्यावे लागेल कारण हे स्टेशन पूर्णपणे महिलांकडून कार्यान्वित केले जाते. इथे काम करणाऱ्या महिला कर्मचारी अत्यंत निष्ठेने आणि तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडतात. म्हणूनच या सर्वांना मानाचा मुजरा करावासा वाटतो.**

# हे सक्षम महिलांचे स्टेशन




इथल्या महिला कर्मचाऱ्यांनी सांगितले की, त्यांना त्यांचे काम करण्याचा अभिमान वाटतो. ग्राहक संबंध व्यवस्थापन पर्यवेक्षक शिल्पा कैलाश अहिरे आपल्याला सांगतात, 'मी येथे व्यावसायिक विभागात काम करते. महसूल आणि ग्राहकांच्या सर्व तक्रारी हाताळते. इथे मी येणाऱ्या सगळ्या आव्हानांना तोंड देते आणि परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करते. मला माझ्या कामाचा अभिमान आहे. मी सध्या चार स्थानके हाताळत आहे. त्यापैकी हे एक सर्व महिलांकडून कार्यान्वित होणारे स्थानक आहे.'

शिल्पा कैलाश पुढे सांगतात, 'अनेक महिलांना अनेक अडचणींचा साम ना करावा लागतो. मुख्य म्हणजे यातील काही अडचणींबाबत त्या पुरुष कर्मचाऱ्यांशी बोलू शकत नाहीत. अशा स्त्री कर्मचाऱ्यांना भावनिकदृष्ट्या योग्य पद्धतीने हाताळावे लागते. एका महिलेने दुसऱ्या महिलेला आधार दिला तरच ती सक्षम होऊ शकते.'

**मानिनी**

या स्टेशनमध्ये महिला कर्मचारी तीन शिफ्टमध्ये काम करतात. मेट्रो स्टेशन नियंत्रक म्हणून इथे मनीषा राजेंद्र सावंत जबाबदारी सांभाळतात. त्या म्हणतात, 'मी येथे स्टेशन नियंत्रक म्हणून काम करते. स्टेशनवर होणाऱ्या कामाचे व्यवस्थापन करणे ही माझी मुख्य जबाबदारी आहे. मी प्रवाशांशी संबंधित सर्व कामे हाताळते. हे नक्कीच एक आव्हानात्मक काम आहे, पण अशक्य नाही. महिला कोणतेही काम कुशलतेने हाताळू शकतात, हे आम्ही सिद्ध केले आहे. इथे तुमच्या वाढीसाठी खूप वाव आहे.'

या मेट्रो स्टेशनमध्ये ट्रेन ऑपरेटर म्हणून कार्यरत असणाऱ्या निकिता महेंद्र धनावडेही मोकळेपणाने आपले मत म ांडताना म्हणतात,'मला सरकारी कर्मचारी असल्याचा अभिमान आहे. गेल्या पाच वर्षांपासून मी इथे कार्यरत आहे. मेट्रो ट्रेन ऑपरेटर म्हणून माझी भूमिका खूप म हत्त्वाची आहे. पण स्वत:ला खूप भाग्यवान समजते की, या नोकरीसाठी माझी निवड करण्यात आली. मी कोविडच्या आधीपासूनच इथे आले. कोविडदरम्यान, आम्हाला ऑनलाइन आणि ऑफलाइन प्रशिक्षण मिळाले. हे प्रशिक्षण हैदराबादमध्ये पूर्ण केले. मला या कामाचा आणि सरकारी कर्मचारी असल्याचा अभिमान आहे. माझी जबाबदारी लोकांना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचवणे ही आहे. वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत आम्ही प्रवाशांना त्वरित मदत देण्याचा प्रयत्न करतो. समाजही आमच्या या कामाचा आणि महत्त्वपूर्ण भूमिकेचा गौरव करतो.' तेव्हा आगामी काळात अशा मानिनींची संख्या वाढेल अशीच अपेक्षा करु या.

# अस्मिता

# कलिंगड खरेदी करताना...

उन्हाळ्यात टरबूज अर्थात कलिंगड खायला कोणाला आवडत नाही! उष्णतेपासून सुटका देणाऱ्या या थंडगार आणि रसरशीत फळाचे आवडीने वेगवेगळ्या प्रकारे सेवन केले जाते. पण टरबूज कसे खरेदी करायचे हे सर्वांनाच माहिती नसते. स्वाभाविकच अगोड, फुकट रंगाचे टरबूज पाहून विरस होतो. तेव्हा योग्य टरबूज खरेदी करण्यासाठी काही गोष्टी नक्की लक्षात ठेवा.

**वजन तपासा**

चांगले टरबूज जड असते. टरबूज हलके असेल तर आतून कोरडे किंवा रंगहीन असण्याची शक्यता असते. म्हणूनच टरबूज खरेदी करताना त्याचे वजन तपासा. गोड टरबूज वजनाला जड असते. जड असण्याचे कारण म्हणजे त्यात पाणी असते आणि रसाळही असते. टरबूज सुकले असता आतील पाणीही सुकते आणि खाताना गोडीही कमी वाटते.



**स्मार्ट खरेदी**

**रंग आणि पोत तपासा**

चांगल्या टरबूजाचा रंग एकसारखा आणि चमकदार असतो. त्याचमुळेच कलिंगडाचा रंग असमान असेल तर ते आतून खराब असल्याची दाट शक्यता असते, हे लक्षात घ्या. तसेच खरेदी करताना टरबूजाचा पोत तपासा. चांगल्या टरबूजाचा पोत पातळ असतो. मात्र त्याची साल खूप मऊ नसते. त्यामुळे साल खूप मऊ असेल तर ते टरबूज फिके निघते, हे लक्षात ठेवा. चांगले कलिंगड वरच्या बाजूला थोडा कठीण असते.

**पिवळा डाग तपासा**

टरबूज बारकाईने बघितले तर त्यावर एक लहान पिवळा डाग दिसतो. टरबूजावर हा पिवळा डाग असेल तर समजून घ्या की फळ व्यवस्थित पिकले आहे आणि आतून लाल आहे. सूर्यप्रकाशामुळे कलिंगड शेतात असताना त्यावर हा डाग दिसतो. मात्र तो नसल्यास ते कच्चे वा रसायनांचा वापर करुन पिकवले असल्याचा धोका असतो. असे कलिंगड बेचव लागते. म्हणूनच पिवळसर डाग असणारे कलिंगडच खरेदी करा. हे फळ आतून गोड असल्याचे प्रमुख लक्षण आहे.

# पीएचडीची तयारी?

**स्कील डेव्हलपमेंट**

अनेक महिलांना उच्च शिक्षण घ्यायचं असतं. संशोधन करायचं असतं. आपल्या आवडत्या विषयात पीएचडी करण्याची इच्छा असते. पण अनेक कारणांमुळे महिला पीएचडी करायला घाबरतात. यासाठी वेळ देता येईल का नाही, अशी भीती त्यांना वाटते. पण पीएचडीसारखी पदवी मिळवल्यामुळे महिलांचा आत्मविश्वास अनेक पटींनी वाढू शकतो. पीएचडीच्या दिशेने पाऊल पुढे टाकताना काय करता येईल याविषयी...

* पीएचडीचा कालावधी तीन ते सहा वर्षांपर्यंत असू शकतो. या काळात खूप संशोधन करावं लागतं. एवढी वर्षं एखाद्या विषयातला रस टिकून रहाणंही गरजेचं असतं. त्यामुळे आपली आवड ओळखून मगच पीएचडीचा विषय निवडा.

* पीएचडीचा विषय ठरवताना ऑनलाईन संशोधन तुमच्या कामी येऊ शकतं. काही संस्थांमध्ये मास्टर्स आणि पीएचडी असे दोन्ही अभ्यासक्रम एकत्रित पूर्ण करता येतात.



* भारतासह परदेशात पीएचडी करण्याचा पर्यायही तुमच्याकडे आहे. अमेरिका, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियसह युरोपियन देशांमध्येही अनेक संधी आहेत. इथे तुम्हाला स्कॉलरशीपही मिळू शकते.

* पीएचडीसाठी तीन ते पाच वर्षं देण्याबाबत मनात शंका असेल तर मास्टर्सपासून सुरूवात करा.

* विविध विद्यापीठे, संस्थांमध्ये पीएचडी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तेव्हा विविध विद्यापीठांमध्ये अर्ज करत रहा. या क्षेत्रातल्या संधीचा शोध घ्या.

# सर्वात मोठे आव्हान



आजकाल इंटरनेट आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनले आहे. शिक्षण, काम आणि मनोरंजनासाठी त्याचा वापर होतो. तथापि, इंटरनेटवर अशाही काही गोष्टी आहेत ज्या समाजासाठी हानिकारक ठरत आहेत. अशीच एक गोष्ट म्हणजे पोर्नोग्राफिक साइट्स. या स्थळांना भेट देणाऱ्या लोकांची संख्या सातत्याने वाढत आहे. एका अहवालानुसार, भारतात पॉर्न चित्रपट पाहण्याचा ट्रेंडही वाढला असून सुमारे १२ टक्के वेबसाइट्स पोर्नोग्राफिक चित्रपटांशी जोडलेल्या आहेत. आजकाल लोकांना पोर्नोग्राफिक चित्रपट सहज पाहता येतात. त्यातच १८ वर्षांखालील ९० टक्के मुले आणि ६० टक्के मुलींनी कधी ना कधी अश्लील चित्रपट पाहिले असल्याचे हा अहवाल सांगतो. आज पहिल्यांदा पॉर्न पाहण्याचे सरासरी वय १२ वर्षे मानले जात आहे. म्हणूनच ही बाब संगोपनाच्या तसेच सामाजिक स्वास्थ आणि स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

पोर्नोग्राफिक चित्रपटांमध्ये अंदाजे ८८ टक्के शारीरिक हिंसाचार असतो, ४८ टक्के प्रकरणांमध्ये तोंडी हिंसाचार असतो आणि ९४ टक्के महिलांना लक्ष्य होताना दाखवले जाते. या व्हिडिओंमध्ये पुरुष नेहमीच शक्तिशाली तर महिलांना आज्ञाधारक दाखवले जाते. ही बाबही पुरुष आणि महिलांमधील असमानता प्रतिबिंबित करते आणि महिलांवरील लैंगिक हिंसाचाराला प्रोत्साहन देते.

या अहवालात असेही म्हटले आहे की, पोर्नोग्राफिक चित्रपट पाहण्याच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे तर बलात्काराच्या घटनांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. लैंगिक हिंसाचाराचा महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. भारतात दररोज अंदाजे ९३ महिलांवर बलात्कार होतात. तेव्हा बलात्काराच्या या वाढत्या घटनांमुळे पोर्नोग्राफिक चित्रपट आणि लैंगिक हिंसाचार यांच्यातील संबंध तपासण्याची गरज आता व्यक्त होते आहे.

**समाजभान**

इंटरनेटवरील अश्लील सामग्रीविरुद्ध सरकारने बरेच नियम केले आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत, इंटरनेटवर अश्लील सामग्री पसरवणे किंवा पोस्ट करणे हा गुन्हा आहे. एखाद्या व्यक्तीने असे केले तर त्याला शिक्षा होऊ शकते. मुलांच्या बाबतीत हा कायदा आणखी कडक आहे, जेणेकरून मुलींना तसेच लहानग्यांना ऑनलाइन शोषणापासून वाचवता येईल. मात्र असे असले तरी सगळ्यांना त्याची जाण नाही. ती निर्माण करणे हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे.



# आहारात हव्या चिया सीड्स



चिया सीड्स अर्थात चिया बिया सध्या अनेकांच्या आहाराचा एक महत्त्वाचा भाग आहेत. या लहान बियांमध्ये कॅल्शियम, मँगनीज, मॅग्नेशियम, सेलेनियम, तांबे, लोह आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असते. त्याम ध्ये अँटीऑक्सिडंट, अल्फा-लिनोलेनिक ॲसिड, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आदीचे प्रमाण देखील जास्त प्रमाणात असते. अनेक अभ्यासातून दिसून आले आहे की, चिया सीड्स आहारात असल्यास हृदयरोग आणि कर्करोगाचा धोका कमी होतो. खेरीज वजन कमी करण्यासाठी देखील त्याचे सेवन फायदेशीर ठरते.

असे असताना तुम्ही केवळ दोन आठवडे दररोज आहारात या बियांचा समावेश केला तर आश्चर्यकारक परिणाम बघायला मिळतील. कारण चिया सीड्सम ध्ये विरघळणारे फायबर भरपूर प्रमाणात असते. विरघळणारे फायबर पाण्याशी संयोग साधून जेलसारखा पदार्थ तयार करते. हा घटक मल मऊ करतो तसेच पचनास मदत करतो. या बियांमध्ये ४० टक्के फायबर असल्यामुळे मलावरोधाची समस्या दूर होते आणि पचनसंस्था वेगाने सुधारते.

चिया सीड्स प्री-बायोटिक म्हणूनही काम करतात. त्यामुळेच आतड्यांच्या आरोग्यरक्षणात त्यांची महत्त्वाची भूमिका दिसते. प्री-बायोटिक्स संयुगे आतड्यांमधील चांगल्या बॅक्टेरियांना पोषण देतात आणि त्यांच्या वाढीस तसेच संतुलित मायक्रोबायोम राखण्यास मदत करतात. हे सर्व आतड्यातील सूक्ष्मजीव पचन, रोगप्रतिकारक शक्ती आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाचे ठरते. तज्ज्ञांच्या मते, चिया बियांमध्ये असणारे फायबर प्री-बायोटिक म्हणून काम करणाऱ्या आतड्यांतील फायदेशीर बॅक्टेरियांना पोषण देत असल्यामुळे आतड्यांना मजबुती मिळते आणि आरोग्य सुधारते.

**स्टे हेल्दी**

तुम्ही दोन आठवडे दररोज चिया बियाचा आहार समावेश केला तर आतडे हायड्रेट राहण्यास मदत होते कारण या सीड्स खाल्ल्यानंतर तुम्ही जास्त पाणी पिता. स्वाभाविकच यामुळे हायड्रेशन वाढते आणि पचनसंस्थेच्या समस्या टाळता येतात. तज्ज्ञांच्या मते, चिया सीड्स वजनाच्या १० पट पाणी शोषून घेतात आणि एक जेल तयार करतात. हे जेल शरीर हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे चिया बियांमधील विरघळणारे फायबर रक्तातील साखरेचे शोषण कमी करते. स्वाभाविकच यामुळे रक्तातील साखरेची वाढ रोखली जाते.

# सदाबहार जीन्स

बाजारात विविध प्रकारच्या जीन्स उपलब्ध आहेत. प्रत्येक जीन्सची स्वत:ची खासियत आहे. तेव्हा तुमच्या वॉर्डरॉबमध्येही यापैकी काही जीन्स असायलाच हव्यात. अशाच काही ट्रेंडी जीन्सवर एक नजर टाकू या.

* कम्फर्ट आणि स्टाईल या दोहोचं मि श्रण फ्लेअर अँकल स्कीनी जीन्समध्ये आढळतं. या जीन्सवर लाँग शर्ट किंवा टॉप घालता येईल.

* फ्लेअर लेग जीन्स हा प्रकारही इन आहे. यावर शॉर्ट शर्ट किंवा टॉप घाला. या जीन्ससोबत बूट किंवा मोजडी घालता येतील.

* कूल लूकसाठी स्ट्रेट लेग जीन्स ट्राय करता येईल. त्यावर ऑफ शोल्डर किंवा क्रॉप टॉप घाला.

* स्लीम वाईड लेग्ड जीन्स हा प्रकार सदाबहार आहे. त्यावर कोणत्याही प्रकारचा टॉप, शर्ट किंवा कुर्ता चांगला दिसेल.

* स्कीनी जीन्सवर टी शर्ट किंवा क्रॉप टॉप घालता येईल.

* क्लासी लूकसाठी बूटकट जीन्स ट्राय करा.

* पलाझो स्टाईल वाईड लेग जीन्स हा प्रकारही इन आहे. ही जीन्स तुम्हाला हटके लूक देऊन जाईल.

* पेपर बॅग वेस्ट पँटवर ट्यूब टॉप ट्राय करता येईल.

**स्टाईल स्टेटमेंट**

**स्कीन केअर**

## वापरा सायीचं स्क्रब



दुधावरची साय त्वचेसाठी वरदान ठरू शकते. सायीपासून छानसा फेस पॅक तयार करता येईल. यासाठी चमचाभर साय घ्या. त्यात अर्धा चमचा ओट्स घाला. हे मिश्रण स्क्रबप्रमाणे काम करेल. यामुळे मृत त्वचा दूर होईल. त्वचेचा काळपटपणा कमी करण्यासाठी या स्क्रबचा नियमित वापर करा.

**स्मार्ट टिप्स**

## टिकवा दागिन्यांची झळाळी

सतत वापरल्यामुळे दागिन्यांची झळाळी कमी होते. त्यातही चांदीचे दागिने लवकर खराब होतात. या दागिन्यांची चमक टिकवण्यासाठी जरा जास्तच काळजी घ्यायला हवी. त्यातील एक भाग म्हणजे कधीही चांदीचे दागिने बाहेर ठेऊ नयेत. शक्यतो ते कापसात गुंडाळून ठेवावेत. चांदीच्या दागिन्यांना पाणी लागणार नाही याची काळजी घ्यावी.



**हेअर केअर**

## उपयुक्त व्हिनेगर

व्हिनेगर केसांसाठी लाभदायी आहे. यामुळे स्कॅल्पचा पीएच बॅलन्स टिकून रहातो. केस स्वच्छ ठेवण्यासाठी व्हिनेगर वापरता येईल. यामुळे केस छान चमकदार होऊ शकतील. केसांचा कोरडेपणा दूर करण्यासाठीही व्हिनेगर लावता येईल. यामुळे केस गळण्याची समस्याही कमी होऊ शकेल.






# तरूण होतेय ईश्वरसाधना!

**भौतिक आणि ऐहिक सुखे हात जोडून उभी असतानाही आज अनेकजण असमाधानी दिसतात. छोटी कुटुंबे, खुंटलेला संवाद यातून मानसिक असुरक्षितता निर्माण होते. त्यावर उपाय म्हणून अध्यात्माच्या आश्रयाला जाणारी तरुण पिढी आज सर्वत्र दिसत आहे. मानसिक समाधानाच्या शोधात ही तरुण पिढी ईश्वराच्या सान्निध्यात जाते. म्हणूनच आज मठ-मंदिरांमध्ये अशा आधुनिक तरुणाईचं दर्शन होऊ लागलं आहे.**

आजकाल अनेक मठ, मंदिरे आणि धार्मिक उपक्रमांमध्ये तरुणांची मोठी गर्दी दिसते. ठरावीक वारी, मंदिरांमध्ये दर्शनासाठी जाणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. छोटी कुटुंबपद्धती, त्यातील ताणतणाव, गतिमान जग यामुळे मनस्वास्थ्य हरवत आहे. आजकाल सर्वत्र झटपट श्रीमंत होण्याची वृत्ती वाढली आहे. त्यातूनच भ्रष्टाचार बोकाळतो आहे. भोगवादी प्रवृत्तीही निर्माण होत आहे. यामुळे संस्कारक्षम पिढी संपत चालली आहे की काय असं वाटतं. या पार्श्वभूमीवर अनेक मठ, मंदिरे, आश्रमांमध्ये दिसणारे चित्र लक्षवेधी भासतं.

संगणकीय युगामुळे ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या आहेत. त्याचबरोबर नोकरी व्यवसायातही अनेक क्षेत्रं खुली झाली आहेत. तरुण पिढीच्या आकांक्षाही वाढल्या आहेत. त्यातून निर्माण होणाऱ्या स्पर्धेत टिकायचं असेल तर प्रचंड धावपळ करावी लागते. त्यातून दैनंदिन जीवनात ताणतणाव निर्माण होतो. या ताण-तणावापासून काही वेळ सुटका मिळवण्यासाठी एखाद्या मठात किंवा मंदिरात ईश्वराच्या सान्निध्यात बसावं असं अनेकांना वाटू लागलं आहे. देवधर्म हे वयस्कर व्यक्तींसाठीच असतात, अशी पूर्वी समजूत होती; पण आता तरुणवर्गही या देवधर्माकडे मोठ्या संख्येकडे आकर्षित होऊ लागला आहे तो मानसिक तणावावर औषध शोधण्यासाठीच. आजकाल गल्लीबोळातील छोट्या-मोठ्या मंदिरातही गर्दी होऊ लागली आहे. काही वर्षांपूर्वी अक्कलकोट, गाणगापूर, महालक्ष्मी आदी देवस्थानी भाविक मर्यादित संख्येने येत. सध्या ही संख्या लाखोंच्या घरात जाते. श्री स्वामी समर्थांच्या जयंती, पुण्यतिथी दिनी तसेच दत्तजयंतीला अक्कलकोट, गाणगापूर येथे येणाऱ्या भाविकांची संख्या पाहिली की आषाढी वारीची आठवण आल्याशिवाय रहात नाही. हीच परिस्थिती शिर्डी, शेगांव, तसेच राज्यातील इतर अनेक धार्मिक ठिकाणी दिसते. संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातही दरवर्षी तरुण-तरूणींची संख्या लक्षणीयरित्या वाढत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं वारी 'हायटेक' करण्याचे प्रयत्न होत आहेत. पारंपरिक वेशात हातात वीणा घेऊन उभा असलेला वारकरी मोबाईल कानाशी लाऊन बोलत असतो; तर जीन्स पँट, टी-शर्ट घातलेल्या तरुण-तरूणींचा घोळका ग्यानबा-तुकारामाचा गजर करत चाललेला दिसतो. वारकऱ्याची आधुनिकता आणि तरुणांनी जोपासलेली परंपरा यांचा सुरेख मेळ आपल्याला पालखी सोहळ्यात दिसून येतो. अर्थात तरुण आणि मध्यमवयीन वर्गामध्ये ही धार्मिकता निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत.

अलिकडच्या काळात एकत्र कुटुंबपद्धती संपुष्टात येत आहे. भौतिकवाद वाढल्याने सर्व सुखसोयी हात जोडून उभ्या आहेत. पती-पत्नी दोघेही नोकरी करत असल्याने उत्पन्नाची बाजू भक्कम झाली आहे. आर्थिकदृष्ट्या संपन्न पिढीला सर्व सुखसोयी हाताशी असताना एक प्रकारचं 'एकटेपण' जाणवू लागलं आहे. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीमुळे कुटुंबाची जबाबदारी वडील किंवा थोरला भाऊ यांच्यावर होती. ते घराची काळजी घेण्यास समर्थ होते. आज कुटुंबाचा आकार कमी झाला. त्यातही पती-पत्नी दोघेही नोकरी-व्यवसायात गुंतल्याने कुटुंबाची जबाबदारी पार पाडताना त्यांच्या नाकी नऊ येत आहे. पूर्वी नोकरीच्या ठिकाणी किंवा वैयक्तिक जीवनात एखादा प्रश्न निर्माण झाल्यास त्या संबंधी घरातील इतरांशी चर्चा करुन मार्ग काढता येत असे. आजकाल ही परिस्थिती नसते. एकमेकांशी संवाद साधण्यास किंवा मन मोकळे करण्यासही वेळ मिळत नाही आणि मिळाला तरी समोरील व्यक्तीला वेळ नसतो किंवा तो ऐकण्याच्या मनःस्थितीत नसतो. त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरं मिळू शकत नाहीत. अशा परिस्थितीत माणसाची घुसमट होऊ लागते. आता कसे होणार, या प्रश्नाने तो अस्वस्थ होतो. त्यामुळे तणाव वाढतो. हा तणाव दूर करण्यासाठी त्याची पावलं नकळत मठ, मंदिरं, आदी ठिकाणी वळतात. एकटेपणाच्या जाणीवे-बरोबरच वाढती असुरक्षितताही अनेकांना अध्यात्माकडे वळवू लागली आहे. सध्या वाहनांची संख्या अफाट झाली आहे. प्रत्येकाला वेळेवर जाण्याची घाई असल्याने वाहतुकीचा वेगही अमर्याद वाढतो. खराब रस्ते तसेच नागरी असुविधांना तोंड देत आपण सुखरूप घरी जातो का? ही चिंता सर्वांना सतावत असते.



त्याचप्रमाणे आजूबाजूच्या अस्थिर राजकीय, सामाजिक परिस्थितीमुळेही असुरक्षिततेची भावना येते. अशा वेळी आधार वाटतो तो एखाद्या ईश्वरीय शक्तीचा. त्याच्या सान्निध्यात गेल्याने भीती निघून जाते, मानसिक समाधान प्राप्त होते, असा अनेकांचा अनुभव आहे.

मठ, मंदिरं आदी ठिकाणी देवतांच्या दर्शनासाठी जाणाऱ्यांमध्ये मोठ्या पदांच्या व्यक्तींपासून सर्वसामान्यांपर्यंत सर्वांचा समावेश असतो. देवदेवतांना सर्वजण समानच असतात ते कधीच गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव करत नाहीत. तरी सुद्धा दर्शनाला येणाऱ्या भाविकांना व्यवस्थापनाच्या धोरणामुळे हा दुजाभाव ठायीठायी जाणवतो. सर्वसामान्य लोक कठिण प्रसंगात देवाला नवस बोलतात. त्याचप्रमाणे आजकाल राजकीय व्यक्ती, अभिनेते यांच्यामधेही ही प्रवृत्ती निर्माण झाली आहे. या मंडळींच्या देवदर्शनाला प्रसिद्धीही अमाप मिळते. देवदर्शनाला जातानासुद्धा हे लोक प्रसिद्धीचे वलय घेऊन जातात. देवदेवतांना दिलं जाणारं दान पूर्वी गुप्त राखलं जाई. आपलं नाव-गाव न सांगता हे दान केलं जाई, पण आता ही परिस्थिती बदलली आहे. आजकाल देणगीदारांची नावं मोठमोठ्या फलकावर लावलेली दिसतात; त्यांच्या सत्कार होतो. नुकत्याच झालेल्या गुरूपोर्णिमा उत्सवात एका भक्तांनं शिर्डीत साईबाबांच्या चरणी १२ किलो सोन्याच्या पादुका अर्पण केल्या. यापूर्वी याच भाविकानं साईबाबांसाठी चांदीचं सिंहासन अर्पण केलं होतं. या दोन्ही घटनांना माध्यमांनी मोठी प्रसिध्दी दिली. खरं तर साईबाबांची राहणी, त्यांची विचारसरणी, त्यांचा उपदेश यांचा अभ्यास केला असता त्यांच्यासाठी अशा सोन्या-चांदीच्या पादुकांची, सिंहासनाची खरंच आवश्यकता आहे का, याचा विचार व्हायला हवा. परंतु आले भक्ताच्या मना..... असं म्हणत या घटनांबाबत फारसं विचारमंथन होत नाही.

आजकाल तणावमुक्तीचे वेगळे असे कार्यक्रम होत आहेत. अध्यात्मिक क्षेत्रातील ज्येष्ठ अभ्यासू व्यक्तीकडून अशा कार्यक्रमाचे आयोजन केलं जातं. या कार्यक्रमासाठी प्रत्येक ठिकाणी हजारोंच्या संख्येने लोक येत असतात. एखाद्या ईश्वरीय शक्तीचं वरदान लाभलेल्या ऋषीतुल्य व्यक्तीला 'गुरू' मानलं जातं. त्यांनी दाखवलेल्या मार्गाने ध्यानधारणा, नामजप आदी केले जाते. या प्रकारामध्ये सातत्य ठेवल्यास ताण-तणावापासून दूर राहता येते. रामदेव बाबांचे योगासनाचे कार्यक्रम असो की, एखाद्या योगी पुरुषाचा सत्संग असो अशा ठिकाणी तरुण आणि मध्यमवयीन मोठ्या संख्येने आल्याचं चित्र दिसतं. आजकाल केवळ धार्मिक कार्यक्रम प्रसारित करणाऱ्या वाहिन्यांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे हजारो, लाखो लोकांना घरबसल्या अशा कार्यक्रमांचा लाभ घेणं सोयीचं झालं आहे.

ईश्वरी शक्तीच्या या ओढीमागं प्रश्नांची वाढती संख्या कारणीभूत आहे. बुद्धीच्या जोरावर मानवाने प्रचंड झेप घेतली असली तरी प्रश्नांची व्याप्तीही वाढत आहे. सर्वच प्रश्नांची उत्तरं आर्थिक बाबींनी सुटतात असं नाही. सर्व उपाय खुंटतात त्याठिकाणी ईश्वरी शक्तीचा आधार घ्यावा लागतो आणि अशा ईश्वरी साधनेमुळे प्रश्नांना सामोरं जाण्याचं धाडस येतं. प्रश्न सुटण्याचे मार्ग सापडतात. कोणी कोणत्या देवतेची उपासना करावी, कोणाच्या सत्संगाला जावे, याबाबत प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. शेवटी श्रद्धा महत्त्वाची. अंतरिक श्रद्धेतून निर्माण होणारी भक्ती सर्वश्रेष्ठ असते. सध्या सर्वांनाच ताणतणाव, असुरक्षितता यांनी ग्रासलं आहे. अशा वेळी कोण कोणाला धीर देणार, म्हणून एखाद्या शक्तीचा आधार घ्यावा लागतो. प्रपंच करताना परमार्थही करणं आवश्यक आहे. प्रापंचिक कटकटीतून काही काळ बाजुला जाऊन एका वेगळ्या विश्वात रमणं महत्त्वाचं आहे. त्यासाठीच आजकाल मठ, मंदिरं आदी ठिकाणी गर्दी वाढते आहे. वैज्ञानिक प्रगतीबरोबर ऐहिक सुखही आलं. पण आत्मिक सुखासाठी अध्यात्माचा आधार घ्यावा लागतो आणि तो घेतल्यास जीवन तणावरहीत आनंदी होऊ शकते, हेच अंतिम सार आहे.

विशेष लेख

## कामातून मिळवा आनंद

प्रत्येक काम आनंददायी असतं. प्रत्येकाच्या बघण्याच्या दृष्टीकोनात फरक असतो. काहींना एखाद्या कामात निराळा आनंद मिळतो तर काहींना तेच काम वैतागवाणं वाटतं. एका कथेच्या माध्यमातून आपण हा विचार समजून घेऊया. एका गावात काही मजूर दगडाचे खांब घडवत होते. त्याच वेळी एक साधू तिथून जात होता. मजुरांना खांब घडवताना बघून साधू



थांबला. इथे कशाची निर्मिती होत आहे, असा प्रश्न त्याने मजुराला केला. दगड फोडतोय मी, दिसत नाही का? असं मजूर वैतागून म्हणाला. हो, दिसतंय खरं पण इथे काय तयार होत आहे, हे मला सांग, असं तो साधू म्हणाला. मला माहित नाही... इथे दगड फोडताना जीव जात आहे आणि इथे काय बनणार अशा प्रश्न या साधू महाराजांना पडलाय, असं तो मजूर पुटपुटला. साधू मुकाट्याने निघून गेला.

बोध

पुढे त्याला दुसरा मजूर दिसला. त्याने त्याला हाच प्रश्न केला. मजूर म्हणाला, साधूबाबा इथे काहीही निर्माण होवो, मला त्याच्याशी काहीच देणं-घेणं नाही. मला दिवसभराच्या कामाचे १०० रूपये मिळतात. त्यातच मला समाधान आहे. साधू पुढे गेला. तिथे त्याला अजून एक मजूर भेटला. साधूने त्यालाही तोच प्रश्न केला. इथे मंदिराची निर्मिती केली जाणार आहे, असं त्या मजुराने सांगितलं. तो पुढे म्हणाला, या गावात कोणतंही मंदिर नाही. धार्मिक उत्सव साजरे करण्यासाठी इथल्या लोकांना दुसऱ्या गावातल्या मंदिरात जावं लागतं. त्यामुळे इथेच मंदिर उभारायचं ठरलं. मीही याच गावचा आहे. गावचे सगळे मजूरही याच गावचे आहेत. दगड फोडताना मारलेल्या प्रत्येक हातोडीतून मला मधूर संगीत ऐकू येतं. मी खूप आनंदी आहे. काही दिवसांनी इथे मंदिर उभारलं जाईल. जत्रा भरेल, आरती होईल. हा विचार करून मी आनंदी असतो. माझ्यासाठी हे फक्त एक काम नाही तर आनंद आहे. रात्री झोपताना डोक्यात मंदिरा-चेच विचार असतात. सकाळी उठल्यावर मी कामाला लागतो. खूपच उत्साह जाणवला की भजन गायला सुरूवात करतो. आयुष्यात काम करताना मी कधीच इतका उत्साही नव्हतो, इतका आनंदी नव्हतो. साधू खूश झाला. तो म्हणाला, की हेच जीवनाचं रहस्य आहे. फरक फक्त दृष्टीकोनाचा आहे. प्रत्येक कामाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिलं तर त्यातून आनंद घेता येतो.

## शिकवण दोह्यांची

संत कबीर यांच्या दोह्यांमधून आयुष्यात सुख आणि यश कसं मिळवायचं हे सांगण्यात आलं आहे. संतांनी आपल्या अभंगांमधून, दोह्यांमधून रचनांमधून भक्तांना कायम मार्गदर्शन केलं आहे. त्यांचे दोहेही असेच दिशादर्शक आहेत. या दोह्यांमधून आपल्याला बरंच काही शिकता येईल.

**धीरे-धीरे रे मना,**
**धीरे सब कुछ होय।**
**मालीं सींचे सौ घडा,**
**ऋतु आए फल होय।।**

याचा अर्थ असा की, आयुष्यात आपण धीर धरायला हवा. सगळं काही मनासारखं होईल. पण त्यासाठी थोडा वेळ जावा लागेल. माळ्याने झाडाला दररोज १०० घडे पाणी घातलं तरी फळ हे त्या त्या ऋतूमध्येच येणार आहे.



**तिनका कबहुं ना निन्दिये।**
**जो पांवन तर होय।।**
**कबहुं उडी आंखिन पडे।**
**तो पीर घनेरी होय।**

याचा अर्थ असा की, पायात येणाऱ्या तृणाचीही कधी निंदा करू नये. कारण हेच तृण डोळ्यात गेलं तर खूप वेदना होतात.

**जिन खोजा तिनपाइया,**
**गहरे पानी पैठ।**
**मैं बपुरा, बूडन डरा।**
**रहा किनारे बैठ।।**

धार्मिक परंपरा

याचा अर्थ असा की, प्रत्येकाला मेहनतीचं फळ मिळतं. जेवढी मेहनत तेवढं फळ. पाण्याच्या डोहात जाणारी व्यक्ती काही तरी घेऊन येतेच. घाबरून किनाऱ्यावर बसून राहिलेल्याला काहीही मिळत नाही.

मांगन मरण समान है,
मति मांगो कोई भीख।
मांगन ते मारना भला,
यह सतगुरू की सीख।।

याचा अर्थ असा की, कोणापुढे कधीही हात पसरू नये. कोणापुढे हात पसरायला लागणं मृत्यूपेक्षाही भयंकर आहे.

## शोध अमरनाथ गुहेचा...

सध्या अमरनाथ यात्रा सुरू आहे. बर्फाच्या शिवलिंगाचं दर्शन घेण्यासाठी भक्तमंडळी उत्सुक आहेत. अमरनाथाच्या पवित्र गुहेत शंकराने पार्वतीला अमरकथा सांगितली होती, असं मानलं जातं. अमरनाथची ही यात्रा कशी लोकप्रिय झाली? या गुहेचा शोध नेमका कोणी लावला, याविषयीची ही रंजक माहिती... अमरनाथ गुहेचा शोध सोळाव्या शतकात एका मुस्लीम मेंढपाळाने लावला, असं जाणकारांचं म्हणणं आहे. यानंतर या स्थानी भक्तमंडळींचा वावर सुरू झाला. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, हा मेंढपाळ मेंढ्यांना चरायला घेऊन गेला होता. मेंढ्या चारता चारता तो खूप दूर, निर्जन स्थळी पोहोचला. या ठिकाणी त्याची भेट एका साधूसोबत झाली. या साधूने त्याला कोळशाने भरलेली टोपली दिली. ही टोपली घेऊन मेंढपाळ घरी आला. त्याने टोपली उघडली. या टोपलीतल्या कोळश्यांचं रूपांतर सोन्यात झालं होतं. मेंढपाळाला भरपूर सोनं मिळालं. या घटनेचं त्याला खूपच आश्चर्य वाटलं. गरीब मेंढपाळ हरखून गेला. त्याने दुसऱ्या दिवशी साधूला भेटायचं ठरवलं. तो त्याच ठिकाणी साधूला भेटायला



गेला. पण त्याचा कुठेच पत्ता नव्हता. तिथे त्याला एक भव्य गुहा दिसली. हीच अमरनाथाची पवित्र गुहा असं मानलं जातं. त्यानंतर या गुहेला तीर्थस्थानाचा दर्जा मिळाला. बाबा अमरनाथाची गुहा म्हणून लोकप्रियता मिळाली. त्यामुळे बाबा अमरनाथला भक्तांनी दिलेल्या दानातला काही हिस्सा या मुस्लीम मेंढपाळाच्या वंशजांना दिला जातो.

जाणून घ्या

## तोचि मूर्ख जाणावा...

समर्थ रामदासांनी दासबोधातल्या दुसऱ्या दशकातल्या पहिल्या समासात मुर्खांची लक्षणं सांगितली आहेत. या जगात मूर्ख कोण हे या लक्षणांवरून ओळखता येईल. समर्थ रामदास म्हणतात, येक मूर्ख, येक पढतमूर्ख, उभय लक्षणीं कौतुक। श्रोतीं सादर विवेक। केला पाहिजे।।४।। मुर्खांचे दोन प्रकार आहेत, असं समर्थ राम दास म्हणतात. मूर्ख आणि पढतमूर्ख असे हे प्रकार होत. या दोन्ही प्रकारांचे वर्णन समर्थांनी केले आहे. ही लक्षणे नीट ऐकून श्रोतेमंडळींनी त्यावर विचार करायला हवा, असं समर्थ सांगतात. समर्थ रामदास पढतमूर्खांची लक्षणं सांगतात. ते म्हणतात, जे प्रापंचिक जन, जयांस नाहीं आत्मज्ञान। जे केवळ अज्ञान त्यांची लक्षणे ।।७।। जन्मला जयांचे उदरीं। तयांसी जो विरोध करी। सखी मानिली अंतुरी। तो येक मूर्ख।।८।। परस्त्रीसीं प्रेमा धरी। श्वसुरगृही वास करी। कुळेंविण कन्या वरी। तो येक मूर्ख।।१०।।

आत्मज्ञान नसलेल्या, केवळ प्रपंचात रमणाऱ्या, अत्यंत अज्ञानी अशा लोकांची ही लक्षणं आहेत. ज्यांच्या उदरातून जन्म घेतला त्या आई-वडिलांना विरोध करणारा, केवळ पत्नीला सखी मानणारा मूर्ख



समजावा. परस्त्रीवर प्रेम करणारा, सासुरवाडीला जाऊन राहणारा, कुळाचा विचार न करता कोणत्याही मुलीशी विवाह करणारा मूर्ख असतो. मुर्खांची अनेक लक्षणं आहेत. समर्थांनी त्यातल्या काही लक्षणांचं वर्णन या समासात केलं आहे. ते पुढे म्हणतात, आपली आपण करी स्तुती। स्वदेशीं भोगी विपत्ति। सांगे वडिलांची किर्ती तो येक मूर्ख।।१२।। अकारण हास्य करी। विवेक सांगता न धरी। जो बहुतांचा वैरी। तो येक मूर्ख।।१३।। स्वतःची स्तुती करणारा, स्वदेशात राहुनही विपत्ती भोगणारा, आपल्या पूर्वजांची कीर्ती सांगणारा मूर्खच असतो. कारण नसताना हसणारा, विवेक शिकूनही त्याचे ग्रहण न करणारा, ज्याचे अनेक वैरी असतात तो मूर्ख मानला जातो.

दासबोधातून

मुर्खांची इतर लक्षणंही समर्थ वर्णन करतात. ते म्हणतात, लक्ष्मी आलियावरी। जो मागील वोळखी न धरी। देवीं ब्राह्मणी सत्ता करी। तो येत मूर्ख ।।६८।। अक्षरें गाळून वाची। कां तें घाली पदरिचीं। नीघा न करी पुस्तकांची। तो येक मूर्ख।।७०।। आपण वाचीना कधीं। कोणास वाचावया नेदी। बांधोन ठेवी बंदीं। तो येक मूर्ख।।७१।। उत्तम लक्षणे घ्यावी। मूर्ख लक्षणे त्यागावी। असंही समर्थ म्हणतात. सत्ता-संपत्तीचा लाभ झाल्यावर अनेकजण जुनी ओळख ठेवत नाहीत, देवावर सत्ता गाजवतात अशांनाही समर्थ मूर्ख असं संबोधतात. वाचन करताना अक्षरं गाळून वाचणारा, पुस्तकांची निगा न राखणारा समर्थांच्या दृष्टीने मूर्खच आहे. स्वतः ग्रंथ न वाचणारा, इतरांना वाचायला न देणारा, ग्रंथ बासनात बांधून ठेवणाराही मूर्खच मानला जातो. मूर्ख लक्षणं सोडून उत्तम लक्षणांचा अंगिकार लोकांनी करायला हवा. म्हणूनच पुढच्या समासांमध्ये समर्थांनी उत्तम लक्षणंही सांगितली आहेत.

## मार्गदर्शन विष्णूपुराणातलं...




हिंदू धर्मात अठरा महापुराणं आहेत. त्यापैकी एक म्हणजे विष्णू पुराण. मनुष्याने जीवनात नेमकं काय करावं, कसं वागावं, दैनंदिन जीवनात कोणत्या गोष्टींचं पालन करावं याबाबतचं ज्ञान वेद-पुराणांमधून देण्यात आलं आहे. यातल्या अनेक बाबी आजच्या काळातही लागू पडतात. दैनंदिन जीवनातली कार्यं करताना कोणत्या गोष्टींचं पालन करावं, याबाबतचं मार्गदर्शन विष्णू पुराणात करण्यात आलं आहे. याबाबत जाणून घेऊया...

* शूचिर्भूत होण्यासाठी दररोज स्नान केलं जातं. स्नानामुळे शरीर स्वच्छ होतं. आपण ताजेतवाने होतो पण जास्त काळपर्यंत स्नान केल्याचे काही दुष्परिणामही आहेत. विष्णू पुराणातही याबाबत नमूद करण्यात आलं आहे. स्नान करण्याचा मूळ उद्देश लक्षात घेऊन वेळेत स्नान करायला हवं.

* झोपण्याच्या सवयीकडे लक्ष द्यायला हवं. झोप कमी असली काय किंवा जास्त असली काय, वाईटच ठरते. प्रत्येकाने आपल्या झोपण्याच्या वेळेकडे लक्ष द्यायला हवं. रात्री लवकर झोपून पहाटे ब्राह्ममुहुर्तावर उठायला हवं, असं विष्णूपुराण सांगतं.

* विष्णूपुराणात व्यायामाचं महत्त्व सांगण्यात आलं आहे पण व्यायामाचा अतिरेक वाईटच. आपली गरज आणि शारीरिक क्षमता लक्षात घेऊन प्रत्येकाने व्यायाम करायला हवा.

* यासोबतच इतर काही बाबी विष्णूपुराणानुसार निषिध्द मानल्या गेल्या आहेत. चार रस्ते एकत्र येतात तो भाग रात्रीच्या वेळी ओलांडू नये, असं विष्णूपुराणात सांगण्यात आलं आहे. रात्रीच्या वेळी या भागात वाईट शक्तींचा वास असल्याने सर्वसामान्य माणसाला आव्हानांचा सामना करावा लागू शकतो, असं यात नमूद करण्यात आलं आहे.

* रात्रीच्या वेळी स्मशानात जाऊ नये, असंही विष्णूपुराणात सांगण्यात आलं आहे.

* वाईट किंवा चारित्र्यहीन लोकांपासून रात्रीच्या वेळी लांब राहायला हवा. अशी माणसं रात्रीच्या वेळी कुकर्म करू शकतात. त्यामुळे त्यांच्यापासून चार हात लांब राहणंच उत्तम, असं विष्णूपुराण सांगतं.

पुराणांमधून

## अनोखं मंदिर गंगेचं...

हिंदूधर्मीयांच्या दृष्टीने गंगा ही अत्यंत पवित्र नदी. गंगेत स्नान केल्याने सात जन्मांची पापं नष्ट होतात असं म्हटलं जातं. म्हणूनच गंगामातेची मनोभावे पूजा केली जाते. बनारसच्या गंगाघाटावर गंगेची आरती केली जाते. गंगापूजनाचं हे दृष्य अत्यंत रमणीय असतं. बनारससोबतच देशातल्या इतर काही ठिकाणी गंगेची मंदिरं आहेत. या मंदिरांमध्ये गंगेची मूर्तीरूपात पूजा केली जाते. असंच एक अनोखं मंदिर राजस्थानातल्या जयपूरमध्ये आहे. महाराजा सवाई माधोसिंह द्वितीय यांनी या मंदिराची निर्मिती केली. या मंदिराची अनेक वैशिष्ट्यं आहेत. गंगेचं हे मंदिर स्थापत्यकलेचा उत्तम नमुना मानलं जातं. यासोबतच गाभाऱ्यात असलेला सुवर्णकलश मंदिराचं खास आकर्षण आहे. या मंदिरातल्या गंगा मातेच्या मूर्तीच्या शेजारी जवळपास ११ किलो वजनाचा सुवर्णकलश ठेवण्यात आला आहे. या कलशात गंगाजल ठेवण्यात आलं असून कलशाच्या सुरक्षेसाठी बंदूकधारी पहारेकऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या कलशाची स्थापना १०३ वर्षांपूर्वी करण्यात आली होती. मंदिराच्या



निर्मितीलाही एवढाच काळ लोटला आहे. एवढ्या मोठ्या काळानंतरही कलशातल्या गंगाजलाचा एक थेंबही कमी झालेला नाही. सवाई माधोसिंह द्वितीय यांच्या पत्नीच्या इच्छेनुसार या मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. या मंदिराच्या बांधकामासाठी संगमरवर आणि लाल दगडांचा वापर करण्यात आला आहे. मंदिरात गंगेचा महिमा वर्णन करणारा एक शिलालेखही आहे. कवी पंडित रामप्रसाद यांनी हा लेख लिहिला आहे. तसंच श्रीकृष्णाच्या आयुष्याशी संबंधित चित्रंही येथे आहेत.

तीर्थक्षेत्र

दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर, सोमवार, दि. ०९ नोव्हेंबर २०२६ पान नं. ८

# झेंडूचा भाव दीडशे रुपयांवर!

## दिवाळीच्या दिवशी सकाळी ५०; दुपारी १०० तर तीननंतर थेट १५० रुपयांवर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : दिवाळीच्या लक्ष्मीपूजनासाठी घराघरांत झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असताना कर्जतच्या बाजारपेठेत यंदा फुलांच्या दराने अक्षरशः उच्चांक गाठला.

दिवाळी आणि झेंडूच्या फुलांचे अतूट नाते आहे. लक्ष्मीपूजन, घराची सजावट, देवघर, वाहनांची पूजा तसेच दुकानांसमोर तोरणे लावण्यासाठी झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी कर्जतच्या बाजारपेठेत सकाळपासूनच फुले खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. मात्र, यंदा फुलांचे दर ऐकून ग्राहकांना आश्चर्याचा धक्का बसला. यंदाच्या दसरा सणावेळी कर्जतच्या बाजारपेठेत झेंडूची फुले ३०, ४० ते ५० रुपये किलो दराने विकली जात होती. त्यामुळे यंदा दिवाळीतही साधारण याच दराने फुले मिळतील, अशी ग्राहकांची अपेक्षा होती. मात्र, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी बाजाराचे चित्र पूर्णपणे बदलले. सकाळी ५० रुपये किलो असलेला भाव दुपारनंतर १०० रुपयांवर पोहोचला. ग्राहकांची संख्या वाढत असताना बाजारात फुलांची आवक मात्र मर्यादित होती. त्यामुळे दुपारी तीननंतर झेंडूच्या फुलांचा दर थेट १५० रुपये किलोपर्यंत गेला.

यंदा कर्जत तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने त्याचा मोठा फटका फुलशेतीलाही बसला आहे. पाण्याअभावी परिसरातील अनेक शेतकऱ्यांची फुलशेती नष्ट झाली. परिणामी, स्थानिक शेतकऱ्यांकडून बाजारपेठेत फुलांची आवक होऊ शकली नाही. लक्ष्मीपूजनाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी विक्रेत्यांना बाहेरील बाजारपेठेतून झेंडूची फुले आणावी लागली. मात्र, मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याने दरात मोठी वाढ झाली, अशी माहिती फुले विक्रेत्यांनी दिली.



### शेतकऱ्यांना नाही, विक्रेत्यांनाच लाभ!

या संपूर्ण दरवाढीतील महत्त्वाची बाब म्हणजे झेंडूच्या फुलांचे भाव गगनाला भिडले असले, तरी त्याचा अपेक्षित फायदा स्थानिक शेतकऱ्यांना मिळाला नाही. दुष्काळामुळे फुलशेतीचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी फुलेच उपलब्ध नव्हती. त्यामुळे बाजारात दरवाढ झाली असली, तरी त्याचा आर्थिक लाभ प्रामुख्याने फुले विक्रेत्यांना मिळाला. एकीकडे दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या हातातून उत्पादन गेले, तर दुसरीकडे सणासुदीच्या दिवशी ग्राहकांना झेंडूच्या फुलांसाठी अधिक पैसे मोजावे लागले.

## टेके पाटील ट्रस्टकडून कपडे वाटप!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : तालुक्यातील वारी येथे सालाबादप्रमाणे राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने दिवाळीनिमित्त दिवंगत ग्रा. पं.सदस्य राहुलदादा टेके पाटील यांच्या स्मरणार्थ वारी परिसरातील सर्वच वयोगटातील लहानग्यांपासून, दिव्यांग बांधव ते वयोवृद्धांपर्यंत जवळपास ६४ लाभार्थ्यांना नवीन वस्त्र वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोपरगाव पंचायत समितीचे माजी सभापती मच्छिंद्र टेके होते. प्रदीप भंडारी, रणजीत खैरनार, अरुण कदम आदींचे सहकार्य लाभले.

## बिबट्याने पाडला वासराचा फडशा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील चिंचपूर पांगुळ येथे बिबट्याने हल्ला करून शेतकऱ्याचे वासरू ठार केल्याची घटना रविवारी रात्री घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिवाळीच्या आनंदोत्सवाच्या रात्रीच ही घटना घडल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

चिंचपूर पांगुळ ते मानेवाडी रस्त्यालगत शेतकरी आजीनाथ पारजी बडे यांची शेती आहे. त्यांनी शेतातील शेडमध्ये गाय व तिचे वासरू बांधले होते. शेताला तारेचे कंपाउंड असतानाही बिबट्याने कंपाउंडच्या खालून आत प्रवेश केला. त्यानंतर वासरावर हल्ला करून त्याला शेडमधून बाहेर ओढत नेले. सुमारे २०० मीटर अंतरावर नेऊन बिबट्याने वासराला ठार केले. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व पंचनामा केला.

## दिवाळीच्या फटाक्यांमुळे घराला आग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : दिवाळीचा सण आनंदात साजरा होत असतानाच पाथर्डी तालुक्यातील कळसपिंपरी येथील वसंतराव नाईक नगर तांड्यावर एका घराला आग लागून मोठे नुकसान झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या आगीत घरातील संसारोपयोगी साहित्य आणि सुमारे दहा क्विंटल कापूस जळून खाक झाला. प्राथमिक माहितीनुसार, फटाक्यांमुळे आग लागल्याचा प्रथमदर्शनी अंदाज व्यक्त केला जात असून, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. वसंतराव नाईक नगर तांड्यावर राहणारे अशोक खेमा चव्हाण हे ऊसतोड कामगार असून, सध्या ऊसतोडणीसाठी कारखान्यावर गेले आहेत. त्यांचे पत्र्याचे घर असून घराशेजारी कापसाची गंजी साठवून ठेवण्यात आली होती. दिवाळीच्या सकाळी अचानक या गंजीला आग लागली. फटाके वाजवत असताना ठिणगी पडून आग लागल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. मात्र, आगीचे अधिकृत कारण अद्याप समोर आलेले नाही. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले.



या आगीत घरातील संसारोपयोगी वस्तूंसह सुमारे दहा क्विंटल कापूस जळून खाक झाला. त्यामुळे चव्हाण कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेच्या वेळी अशोक चव्हाण हे कामानिमित्त बाहेरगावी होते. घरात त्यांचा दहा वर्षांचा मुलगा होता; मात्र तोही घराबाहेर असल्याने मोठी जीवितहानी टळली.

## 'साकळाई' चे तातडीने काम सुरू करा!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिरायती भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेला राज्य सरकारने मंजुरी देऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, अद्याप योजनेच्या कामाचे भूमिपूजन झालेले नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिवाळीत भूमिपूजन करण्याचे जाहीर केले होते. त्यामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी दिलेल्या शब्दानुसार तातडीने भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. तसेच दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी व पशुपालकांना दिलासा देण्यासाठी चारा छावण्या, चारा डेपो सुरू करावेत किंवा पशुधन वाचविण्यासाठी तातडीने अनुदान जाहीर करावे, अशी मागणी साकळाई योजना कृती समितीने केली आहे.

या मागण्यांसाठी गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून हिवरे झरे, ता. नगर येथे जनआंदोलन आणि रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष बाबा महाराज झेंडे, गोवर्धन कार्ले, नारायण रोडे, सोमनाथ घाडगे आदी उपस्थित होते. या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने योजनेला मंजुरी दिली. मात्र, मंजुरी मिळून सहा महिने उलटले तरी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.



भूमिपूजनाची तारीख जाहीर न झाल्यास १२ नोव्हेंबर २०२६ पासून पुन्हा जनआंदोलन सुरू करण्यात येईल. या आंदोलनाची सुरुवात हिवरे झरे, ता. नगर, जि. अहिल्यानगर येथून रास्ता रोको करून करण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळी ९ वाजता आंदोलन सुरू होईल. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही समितीने दिला आहे.










The Newpaper / Periodical Is Published at AJIT RAMESH MORE On Behalf Of AJIT RAMESH MORE, Printed at SAIVED PRAKASHAN PRIVATE LIMITED, IINDIRA NAGAR, PLOT NO.20, SHIRASGAON, SHRIRAMPUR, AHMEDNAGAR, MAHARASHTRA - 413709.
And Published At A/P. KOLHAR BK, TAL - RAHATA, AHILYANAGAR, MAHARASHTRA - 413710, Editor AJIT RAMESH MORE. Daily Janta Awaj, RNI No. MAHMAR/2022/85155.